रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३६
www.ramprahar.com
शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग
पनवेलच्या बारवईजवळ अनेक वाहनांचा अपघात/२
जीव धोक्यात घालून वीजपुरवठा केला सुरू/५
राज्य पिंच्याक सिलॅट स्पर्धेत नवी मुंबई संघ विजेता/८

## गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी



**मुंबई** : यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळाला आहे. सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत मुंबई–बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर टोलमाफी जाहीर केली आहे. ही सवलत कोकणात जाणाऱ्या सर्व खासगी वाहनांना आणि एसटी बसेसना लागू असणार आहे. या सवलतीसाठी गणेशोत्सव २०२५–कोकण दर्शन नावाचे विशेष टोलमाफी पास उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या पासवर वाहन क्रमांक व वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल. हे पास प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस, वाहतूक विभागाकडे उपलब्ध असतील. परतीच्या प्रवासासाठीही हेच पास वैध असतील.

# भाजपमध्ये इनकमिंग सुरूच

## विविध पक्षांचे नेते, पदाधिकाऱ्यांच्या हाती ‘कमळ’



**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे चंद्रपूरमधील नेते अनिल धानोरकर यांनी गुरुवारी (दि. २१) भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्यासोबत नगरसेवकांनीही ‘कमळ’ हाती घेतले. याशिवाय पालघर, रत्नागिरीतील नेत्यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर, मंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत भाजपचा झेंडा हाती घेतला.

अनिल धानोरकर हे चंद्रपूर लोकसभेच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांचे दीर आणि दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांचे सख्खे मोठे बंधू आहेत. ते भद्रावती नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष असून दोन वर्ष त्यांच्याकडे ठाकरेंच्या शिवसेना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी होती. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्या नेतृत्वात धानोरकर कुटुंबियांची भद्रावती नगर परिषदेवर एकहाती सत्ता आहे.

विधानसभा निवडणुकीत अनिल धानोरकर यांना वरोरा विधानसभा क्षेत्रातून काँग्रेसने उमेदवारी नाकारली होती. त्यानंतर त्यांनी प्रतिभा धानोरकर यांच्याबद्दल जाहीर नाराजी दाखवली आणि वंचितच्या तिकीटावर विधानसभा निवडणूक लढवली होती. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला असून त्यामुळे पक्षाची ताकद तिथे वाढली आहे. मुंबईतील भाजपच्या कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा झाला.

याचबरोबर पालघर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम, माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते नंदकुमार पाटील, त्यांच्या पत्नी रेश्मा पाटील, कामगार क्षेत्रातील ज्येष्ठ कार्यकर्ते व उबाठा नेते उपेंद्र पाटील यांनी समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. याशिवाय रत्नागिरी जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)चे नेते प्रशांत यादव यांनीही समर्थकांसह ‘कमळ’ हाती घेतले.

## नवीन आयकर कायद्यासह १९ विधेयके मंजूर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नवीन आयकर कायदा विधेयकासह एकूण १९ विधेयके गुरुवारी (दि. २१) संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आली. या विधेयकांमध्ये १९६१च्या आयकर कायद्यात सुधारणा आणि गुन्हेगारी आरोप असलेल्या मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी संविधानात सुधारणा या दोन महत्त्वपूर्ण प्रस्तावांचा समावेश आहे.

प्राप्तिकर विधेयक आणि कर कायदा (सुधारित) विधेयकाव्यतिरिक्त संसदेने ऑनलाइन गेमिंग विधेयकाला मंजुरी दिली. यशिवाय मणिपूरशी संबंधित दोन विधेयके, जीएसटी (सुधारित) विधेयक आणि विनियोजन (क्रमांक २) विधेयक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट्सच्या कामकाजाशी संबंधित दुसरे विधेयकदेखील मंजूर करण्यात आले.

२१ जुलै रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारताच्या लष्करी प्रतिसादावर निषेध करुन सुरू झालेल्या या अधिवेशनात लोकसभेने १२ आणि राज्यसभेने १४ विधेयके मंजूर केली आहेत. गुरुवारी अधिवेशनाचा समारोप झाला.

## उरण-नेरूळ रेल्वे प्रकल्पाबाबत सकारात्मक चर्चा; लवकरच फेऱ्या वाढणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी रेल्वे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान उरण ते नेरूळ या महत्त्वपूर्ण रेल्वेमार्गाच्या संदर्भात केंद्रातील संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा झाली.



प्रवाशांच्या सोयीसाठी लवकरच सध्याच्या ४० फेऱ्यांऐवजी ५० फेऱ्या सुरू करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून लवकरच अंमलबजावणी होणार आहे. यामुळे उरण व नेरूळ परिसरातील प्रवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सुकर, सोयीस्कर आणि वेळेवर होणार आहे.

या बैठकीत केवळ रेल्वेमार्ग, फेऱ्या वाढविण्याबाबतच नव्हे; तर प्रवाशांना भेडसावणाऱ्या इतर प्रश्नांवरही सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली. स्टेशनवरील सुविधा, वेळापत्रकातील नियमितता, तांत्रिक अडचणी आणि स्थानिक गरजांबाबत मांडणी करून त्यांचे निराकरण करण्यासाठी लवकरच ठोस पावले उचलली जाणार आहेत.

उरण–नेरूळ परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी नेहमीप्रमाणेच मी सातत्याने प्रयत्नशील आहे. या निर्णयामुळे स्थानिक प्रवाशांना दिलासा मिळणार असून रेल्वेसेवेमध्ये लक्षणीय सुधारणा होणार आहे, असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले.

## सर्वांनी एकत्र येऊन काम करा -लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवसंघर्ष प्रतिष्ठान आणि भाजप जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सुटतील, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे नोडमध्ये व्यक्त करून सर्वांनी एकत्रित येऊन काम करावे, असे प्रतिपादन केले.

उलवे नोड सेक्टर ६ येथे शिवसंघर्ष प्रतिष्ठान आणि भाजप जनसंपर्क कार्यालय अखिलेश यादव यांनी सुरू केले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. २०) झाले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी उपसरपंच अमर म्हात्रे, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, अखिलेश यादव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अखिलेश यादव यांच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या सामाजिक कार्याचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

## जीएसटीचे दोन स्लॅब घटणार

**नवी दिल्ली** : केंद्र सरकार सर्वसामान्यांना दिलासा देत जीएसटीचे स्लॅब घटवणार आहे. याबाबतचा सरकारचा प्रस्ताव मंत्रिगटाने स्वीकारला आहे. त्यानुसार १२ आणि २८ टक्क्यांचा स्लॅब बंद केला जाणार असून आता फक्त ५ आणि १८ टक्के स्लॅब राहणार आहे.

सध्या जीएसटीचे ५, १२, १८ आणि २८ टक्के असे चार स्लॅब आहेत. यापैकी १२ आणि २८ टक्के असे दोन स्लॅब बंद केले जाणार आहेत. आता १२ टक्के स्लॅबमध्ये असलेल्या वस्तू व सेवा पाच टक्क्यांमध्ये येईल, तर २८ टक्के स्लॅबमधील जवळपास ९० टक्के वस्तू १८ टक्क्यांमध्ये येतील. यामुळे सर्वसामान्य लोकांना दिलासा मिळणार आहे.

## पनवेलमध्ये उद्यापासून जिल्हास्तरीय भजन स्पर्धा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील मंडळाच्या सभागृहात दोन दिवसीय रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि. २३) सकाळी ९. ३० वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पं. शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील, हभप निवृत्तीबुवा चौधरी, शंकुनाथबुवा पडघेकर, महादेवबुवा शहाबाजकर, ‘सारेगम’फेम जितेंद्र तुपे, इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

स्पर्धा पुरुष खुला गट आणि महिला खुला गट अशा दोन गटात होणार आहे. प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय २५ हजार रुपये, तृतीय १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक सात हजार रुपये तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी सात हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह असे आहे.

शनिवार आणि रविवार अशी दोन दिवस होणाऱ्या या स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा २४ ऑगस्टला सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. भजनप्रेमी रसिकांनी स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर विकास मंडळाचे अध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर व आयोजन समितीने केले आहे.

## पाच दिवसांनंतर सूर्यदर्शन

### गणेशोत्सवाच्या खरेदीला वेग

**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या पाच दिवसांपासून म्हणजे गोकुळाष्टमीपासून मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. जीवित व वित्तहानी झाली. त्यानंतर गुरुवारी (दि. २१) सकाळी सूर्यदर्शन झाले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. दरम्यान, गौरी गणपतीच्या खरेदीसाठी बाजारात गर्दी वाढू लागली आहे.

गणेशोत्सव तोंडावर आला असताना पावसाने पाच दिवस धुमाकूळ घातल्याने अनेकांना खरेदी करता आली नाही. १५ ऑगस्टपासून तीन दिवस सुट्टी असल्याने गौरी गणपतीची खरेदी करण्याचे अनेकांनी ठरवले होते, मात्र त्याचवेळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले. त्यामुळे खरेदी तर दूरच राहिली, पण या पावसापासून बचाव करताना अनेकांची त्रेधातिरपीट उडाली.

अखेर गुरुवारी सूर्यदर्शन झाले. अधूनमधून पावसाच्या सरी येत असल्या तरी मधल्या वेळेत उघडीप असल्याने गणेशोत्सवाची खरेदी जोमाने सुरू आहे.

## राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी (दि. २१) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली.

यानंतर राज यांनी त्यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. टाऊन प्लॅनिंगसंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे राज यांनी या वेळी सांगितले.

## वेल्हे तालुक्याचे नाव आता राजगड

**पुणे** : जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचे नाव बदलून राजगड करण्याचा ऐतिहासिक निर्णय अखेर अमलात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची पहिली राजधानी असलेल्या राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या वेल्हे तालुक्याला आता अधिकृतरीत्या राजगड तालुका म्हणून ओळख मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात कार्यवाही केली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तालुक्याचे नाव बदलण्याचा ठराव घेण्यात आला होता. त्यानंतर केंद्र सरकारकडूनही यास हिरवा कंदील मिळाला असून लवकरच महाराष्ट्र शासन याबाबतचे राजपत्र प्रसिद्ध करणार आहे.






# कॉर्पोरेट कंपन्यांनी दुर्गम व मागास जिल्ह्यांमध्ये काम करावे -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

कॉर्पोरेट व खासगी संस्थांनी आपले सामाजिक उत्तरदायित्वाचे काम करताना शहरी भागावर लक्ष केंद्रीत न करता दुर्गम आणि विकासाच्या दृष्टीने मागास जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक व सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम राबविण्यावर भर द्यावा. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तनाच्या नव्या टप्प्यात सर्वांनी एकत्र येत व्यापक आणि परिणामकारक परिवर्तन घडवून आणूयात, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनच्या पाचव्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी सिद्धिविनायक देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर, मुख्य सचिव राजेश कुमार, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, व्हीएसटीएफचे व्यवस्थापकीय संचालक प्रवीणसिंह परदेशी, टाटा ग्रुपचे अध्यक्ष नोवेल टाटा, जेएसडब्ल्यू ग्रुपच्या संगीता जिंदाल, आयडीबीआयचे व्यवस्थापकीय संचालक राकेश शर्मा,जीआयसी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक




रामास्वामी नारायणन, यांच्यासह गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एसटीएल लिमिटेडने तयार केलेल्या जलसंधारण कामाच्या अहवालाचे प्रकाशन तसेच लातूर येथील रावसाहेब पाटील शेतकरी उत्पादक कंपनीच्या वेअर हाऊसचे ई अनावरण करण्यात आले. दर्जा व्यवस्थापनासंदर्भात क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया आणि व्हिएसटीएफ यांच्यात तसेच 'हरित छत्रपती संभाजी नगर उपक्रम' राबविण्यासंदर्भात एसटीएल, व्हिएसटीएफ व छत्रपती संभाजी नगर महापालिका, सामाजिक वनीकरण विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, व्हीएसटीएफच्या पहिल्या टप्प्यात अनेक गावांमध्ये राबविलेल्या योजनांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून त्याच्या मूल्यमापनाचे परिणाम उत्साहवर्धक आहे. या टप्प्यात काही त्रुटी राहिल्या असल्या तरी त्या सुधारून दुसऱ्या टप्पा अधिक प्रभावीपणे राबवून तो यशस्वी करू. ग्राम परिवर्तन उपक्रमाची अंमलबजावणी करताना व्हीएसटीएफचे फेलोज गावातून बाहेर पडल्यावर तेथील परिवर्तनाचा वेग मंदावल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या पुढील काळात गावातच उपलब्ध मनुष्यबळावर आधारित संस्थात्मक संरचना उभी करणे गरजेचे आहे. गावांमध्ये योजनांची अंमलबजावणी करताना प्रत्येक गावाची गरज ओळखून योजनांमध्ये बदल केल्यास परिवर्तनाची गती वाढेल. व्हीएसटीएफ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात अनेक खासगी कंपन्यांनी व सामाजिक उत्तरदायित्व क्षेत्रातील भागीदारांनी केवळ आर्थिक सहाय्यच नव्हे तर धोरणात्मक बदल, नवी तंत्रज्ञान, डेटा आधारित प्रक्रिया आणि नाविन्यपूर्ण उपाय सुचवून शासनाच्या प्रयत्नांना बळकटी दिली. हे परिवर्तन केवळ योजना राबवणे नव्हे, तर गावात समर्पित व्यक्तींची उपस्थिती, सामाजिक बांधिलकीने काम करणारे फेलोज आणि स्थानिक पातळीवर संस्था उभ्या करण्यावर लक्ष केंद्रीत होते, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

प्रत्येक खासगी भागीदारांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, सरकारी योजनांची सखोल माहिती व सहयोगाने गावोगावी उत्तम परिणाम साधता आला आहे. व्हीएसटीएफ आणि भागीदार असलेल्या खासगी कंपन्यांमुळे ग्राम विकास परिवर्तनात चांगले काम झाले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या 'लखपती दीदी' योजनेचा राज्यात मोठ्या प्रमाणावर लाभ झाला असून, केवळ दोन वर्षांत महाराष्ट्रात ५० लाख महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. शासनाकडून त्यांना केवळ संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या असून त्याचे खरे श्रेय त्या महिलांचेच आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

यावेळी श्री. परदेशी यांनी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनच्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाची माहिती दिली. तसेच त्यामुळे झालेल्या परिवर्तनाचा आढावा सादर केला. सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात ग्राम विकासासाठी मिशन महा कर्मयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम राज्यातील सर्वच जिल्ह्यात राबविण्यात यावा. मिशन कर्मयोगी उपक्रमाच्या माध्यमातून गावातील ग्रामस्तरावरील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात यावे, असे श्री. परदेशी यांनी यावेळी सांगितले.

## पनवेलच्या बारवईजवळ अनेक वाहनांचा अपघात

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे महामार्गावर गुरुवारी दुपारी बारवाईजवळ एक भयानक अपघात घडला. या अपघातात ४-५ वाहने एकमेकांवर आदळून थेट रस्त्याच्या कडेला फेकली गेली.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक चालक जुना मुंबई-पुणे महामार्गावरून जात असताना बारवईजवळील एका कठीण वळणावर अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले व समोरून जात असलेल्या गाड्यांना जोरदार ठोकर मारली. या धडकेत एक रिक्षा, मारुती इको कार, हुंदाई आय-१० आणि स्कोडा कार यांचा समावेश आहे. अपघात इतका तीव्र होता की, सर्व वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. या घटनेमुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

अपघाताचा आवाज ऐकून आजूबाजूचे नागरिक आणि स्थानिक लोक तातडीने मदतीसाठी धावले. त्यांनी जखमींना गाड्यांमधून बाहेर काढले आणि पोलिस तसेच रुग्णवाहिकेला माहिती दिली. जखमींना तत्काळ जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही, मात्र जखमींची संख्या आणि त्यांची स्थिती याबाबत अधिक माहिती प्राप्त झाली नाही. स्थानिकांच्या तत्परतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय मदत मिळाली.

या अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. ट्रक चालकाने वाहनावरील नियंत्रण कसे गमावले, याबाबत तपास सुरू आहे.



## राज्य नाट्य स्पर्धेतील पारितोषिक रकमेत दुपटीने वाढ -मंत्री शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्य संचनालयातर्फे घेण्यात येणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्थांना नाटक सादर केल्यानंतर नाट्यनिर्मिती जो खर्च देण्यात येतो. तसेच नाट्यसंस्थेस मूळ ठिकाणाहून दुसऱ्या केंद्रावर नाटक सादर केल्यास त्या कलाकारांना दैनिक भत्ता देण्यात येतो. या सर्व रकमांमध्ये दुपटीने वाढ करण्याचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री. ॲड आशिष शेलार यांनी घेतला असून याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने दरवर्षी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.



राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतर्गत हौशी मराठी, हिंदी, संगीत, संस्कृत, बालनाट्य, दिव्यांग बालनाट्य व व्यावसायिक नाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्था व कलाकारांना रोख रकमेची पारितोषिके प्रदान करण्यात येतात तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्थांना नाटक सादर केल्यानंतर नाट्यनिर्मिती खर्च देण्यात येतो. तसेच नाट्यसंस्थेस मूळ ठिकाणाहून दुसऱ्या केंद्रावर नाटक सादर केल्यास त्या कलाकारांना दैनिक भत्ता देण्यात येतो. गेली अनेक वर्ष राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संस्था व कलाकारांनी पारितोषिक रकमा, नाट्यनिर्मिती खर्च आणि दैनिक भत्त्यात वाढ करण्याबाबत मागणी केली होती.

या मागणीचा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी सकारात्मक निर्णय घेऊन यामध्ये दुपटीने वाढ करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदरच्या शासन निर्णयातील पारितोषिक रकमा, नाट्यनिर्मिती खर्च आणि दैनिक भत्ता इ. तील वाढीव रकमांचा लाभ दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५ पासून सुरु होणाऱ्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेपासून लागू होणार आहे.

## संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान द्या

### भाजपच्या संजय ढवळे यांचे तहसीलदारांना निवेदन

**माणगाव : प्रतिनिधी**

शासनाने गरजूंना दिलासा देण्यासाठी राबविलेली संजय गांधी निराधार योजना अनेक लाभार्थ्यांसाठी जीवनधन ठरत आहे. तथापि, माणगाव तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांना या योजनेचे अनुदान वेळेवर मिळत नसल्याने तक्रारींचा ओघ वाढला आहे. या संदर्भात भारतीय जनता पार्टी संजय गांधी निराधार योजना माणगाव तालुका माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह तहसील कार्यालयात ता. २१ ऑगस्ट रोजी माणगाव तहसीलदार दशरथ काळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन देऊन शासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले.



यावेळी संजय गांधी निराधार योजना माणगाव तालुका माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळे, भाजप नेते चिन्मय मोने, भाजप माणगाव तालुका माजी अध्यक्ष गोविंद कासार, माजी उपतालुका अध्यक्ष अरुण पेणकर, सुरेंद्र साळी, कुर्ले आण्णा, शर्मिला सत्वे, रितेश निवाने, राजू मुंढे, योगेश पालकर, राहुल धूपकर, आनंन राजबर, अश्विनी कडू, जयेंद्र मुंढे, सदानंद अडीत, सोहम शिर्के, मृदल भोनकर, भारत जैन, गणेश राजपुरकर, दीपक भोसले, तुषार नवगणे, जयदीप करडे, रोहित कदम, विश्वास कदम, विशाल शिगवण, रेवती कोळी, राकेश ढवळे, देवेंद्र ढवळे, फौजी अशोक घाग यांच्यासह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

सध्या अतिवृष्टीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्याचबरोबर सणासुदीचे दिवस ही आले आहेत. संजय गांधी निराधार योजनेतील काही लाभार्थ्यांना तांत्रिक बाबी किंवा त्रुटी आढळून येत असल्यास त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत व लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ द्यावा अशी ही मागणी प्राधान्याने केली. ज्या लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यात पैसे मिळाले नसतील त्यांची माहिती घेऊन त्यांच्या खात्यावर पैसे जमा करावेत असे आवाहन केले.

**माणगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेसाठी मी पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. असे कोणीही लाभार्थी या योजना व अनुदानापासून वंचित राहणार नाही या विषयाकडे मी स्वतः विशेष लक्ष देत आहे. तरीही जर कोणाला अनुदान मिळाली नसेल तर ऑगस्ट महिन्याच्या अखेरपर्यंत ते निश्चितपणे व्यतिरिक्त केले जाईल**

**-दशरथ काळे**
**तहसीलदार, माणगाव**

## मुंबईच्या समुद्रात मच्छीमार बोट बुडाली

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील गेट वे ऑफ इंडियाच्या समोर समुद्रात गुरुवारी (दि. २१) सकाळी गुजरातमधील वेरावळ येथील बोट बुडाली. प्राप्त झालेल्या माहितीनुसार ही मासेमारी नौका गुजरात येथील असल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेची माहिती मिळताच सीआयएसएफ आणि नौदलाच्या गस्त नौकाद्वारे बचावकार्य सुरू करण्यात आले आहे, मात्र हा अपघात कशामुळे झाला, बोटीवर कितीजण होते? जीवितहानी झालेली आहे का? किती नुकसान झाले? याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

## शिरवणेत स्मार्ट मीटरविरोधात महावितरण कार्यालयावर रहिवाशांचा मोर्चा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे गाव व शिरवणे गावातील सर्व संघटना यांच्या वतीने महावितरण यांच्या नेरूळ येथील कार्यालयावर स्मार्ट मीटरच्या विरोधात प्रचंड मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात भाजप जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश ज.पाटील, माजी नगरसेवक काशिनाथ पाटील, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर सुतार, माजी नगरसेविका रोहिणी भोईर, समाजसेवक संतोष सुतार, समाजसेवक




नरेश सुतार, प्रभाकर ठाकूर, अविनाश ह. सुतार, महेश पाटील, दिपेश पाटील, प्रल्हाद म्हात्रे, शिरवणे गावातील ग्रामस्थ तसेच सर्व संघटना आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी डॉ. राजेश पाटील यांनी रहिवाशांची भूमिका मांडताना सांगितले की, स्मार्ट मीटरच्या नावाखाली एमएसइबीचे अधिकारी, कॉन्ट्रॅक्टर चुकीच्या गोष्टी करत आहेत. त्याविरोधात रहिवाश्यांनी काढलेला हा मोर्चा आहे.नादुरुस्त मीटर बदलण्याबाबत आमचं काही म्हणणं नसूनचांगल्या अवस्थेतील मीटर बदलण्यास आमचा विरोध आहे. सामान्य घटकांकडे स्मार्ट मीटर लावणे जाणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले असतानाही लोकांना विश्वासात न घेता रात्रीच्या अंधारात येऊन एमएसइबीद्वारे स्मार्ट मीटर लावले जातात.

आमचा टेक्नॉलॉजीला विरोध नाही. मात्र सामान्य नागरिकांना होणाऱ्या त्रास सहन केला जाणार नाही. एमएसइबीने नागरिकांना शासनाचे परिपत्रक दाखवावे,त्रासन देता जनजागृती करून, विश्वासात घेऊन कामाच्या वेळेतच येऊन काम करावे, फक्त नादुरुस्त असलेले मीटर बदलावेत, अशी भूमिका आमच्या शिष्ट मंडळाने मांडली येथील अधिकाऱ्यांनी आमची भूमिका मान्य केली आहे,

## 'जेएसडब्ल्यू'च्या विस्तारीकरणासाठी आज जनसुनावणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

धरमतर पोर्ट आणि जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या डोलवी येथील प्रकल्पाचा विस्तार होणार आहे. या विस्तारित प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियामक मंडळाच्या वतीने शुक्रवारी (दि. २२) पर्यावरण विषयक जनसुनावणीचे आयोजन केले आहे. अडीच वाजता धरमतर जेटी वाहनतळ येथे ही जनसुनावणी पार पडणार आहे.

जेएसडब्लू कंपनीचा धरमतर येथे स्टिल प्लांन्ट आणि पोर्ट प्रकल्प आहे. या प्रकल्पांचा विस्तार करण्याचा निर्णय कंपनी प्रशासनाने घेतला आहे. यासाठी कंपनी २३ हजार ६८८ कोटींची गुंतवणूक करणार असून, प्रकल्पाच्या उभारणीच्या काळात सहा हजार जणांना तर उभारणी नंतर साडे तीन हजार जणांना रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे. प्रकल्पातील स्टील उत्पादनात पाच एमटीपीएची वाढ अपेक्षीत आहे. या प्रकल्पाच्या विस्तारीकरणाच्या पार्श्वभूमीवर जेएसडब्ल्यू फेज तीन आणि एकात्मिक स्टिल प्लाटच्या क्षमतेचे विस्तारीकरणाबाबतच्या दोन सुनावण्या एकाच दिवशी, एका तासाच्या फरकाने ठेवण्यात आल्या आहेत, असे महाराष्ट्र प्रदुषण मंडळाडून प्रसिध्द केलेल्या नोटीसीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

या प्रकल्पाच्या सभोवतालच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सदरील जनसुनावणीसाठी उपस्थित राहणार आहेत.

## 'केक वर्ल्ड'चे रोहन म्हात्रे यांचे निधन

**पनवेल : वार्ताहर**

उरणचा धाडसी उद्योजक रोहन दिलीप म्हात्रे यांना कॅन्सरने हिरावून नेले. उरणमधील प्रभावशाली घराण्यात जन्मलेले रोहन म्हात्रे हे केवळ उद्योजक नव्हते, तर ते स्वप्नाळू आणि धाडसी व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वत्र ओळखले जात. लहानपणापासूनच हटके विचार आणि वेगळी शैली हे त्यांचे वैशिष्ट्य होते.



रोहन म्हात्रे यांनी २४ डिसेंबर२०१५ रोजी कामोठे येथे पहिलं केक वर्ल्ड हे शॉप सुरु झालं. खेळण्यांच्या दुकानासारखा दिसणारा स्टोर म्हणजे 'केकवर्ल्ड', प्रत्येक केकसोबत छोटी गिफ्ट अशी नवी संकल्पना ग्राहकांना भुरळ घालणारी ठरली. पहिल्या दिवसापासूनच मोठी गर्दी झाली आणि केक वर्ल्डची गरुड झेप सुरु झाली. एका वर्षात नऊ शाखा सुरू झाल्या, तर २०२०पर्यंत ७० दुकाने व ४०० कर्मचारी या परिवारात सामील झाले. रोहन यांनी केक वर्ल्डला केवळ दुकान न ठेवता स्टार्टअपसारखे चालवले. अगदी मर्सिडीज कारमधून केक डिलिव्हरी करण्याचाही त्यांनी विचार केला होता.

## सागर ओसवाल जैन प्रकोष्ठ अध्यक्षपदी

**चौक : प्रतिनिधी**

भाजप खालापूर तालुका जैन प्रकोष्ठ अध्यक्षपदी चौक येथील व्यावसायिक सागर ओसवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



भाजपचा सक्रिय कार्यकर्ता ते चौक शहर उपाध्यक्ष म्हणून त्यांनी पक्ष वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. नव्या नियुक्तीबद्दल आमदार महेश बालदी, उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, मोतीराम ठोंबरे यांच्यासह इतरांनी ओसवाल यांचे अभिनंदन केले.

## हृदयविकार असलेल्या ६१९ बालरुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया

**नवी मुंबई: बातमीदार**

नवी मुंबईतील खारघर येथील श्री सत्य साई संजीवनी सेंटर फॉर चाइल्ड हार्ट केअरमध्ये मोफत हृदय शस्त्रक्रिया करून जन्मजात हृदयविकाराने ग्रस्त सुमारे ६१९ बालरुग्णांना नवे आयुष्य मिळाले. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे एअरपोर्टच्या नेतृत्वाखाली 'गिफ्ट ऑफ लाईफ' प्रकल्पांतर्गत तसेच प्रकल्पाचे अध्यक्ष पीपी नितीन मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया करण्यासाठी सुमारे १० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला. जमा झालेल्या पैशातून ६१९ बालरुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

या बालरुग्णांना मिळालेल्या नव्या आयुष्याचा आनंद साजरा करण्यासाठी, सुप्रसिद्ध क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी रुग्णालयतील बालरुग्ण व त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली व त्यांच्याशी



मनमोकळा संवाद साधला.हृदयविकार असलेल्या बालरुग्णांवर शस्त्रक्रिया ही एक आव्हानात्मक व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. हृदयातील छिद्रे, ऱ्हदयाच्या झडपांसंबंधीत समस्या किंवा असामान्य रक्तवाहिन्या यासारख्या आजाराशी झुंजणाऱ्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. यावर वेळीच उपचार न केल्यास दम लागणे, मुलांची वाढ खुंटणे, वारंवार संसर्ग होणे आणि अकाली मृत्यू यासारख्या गंभीर गुंतागुंतीचा सामना करावा लागू शकतो.

## नाट्य शुक्रवारमध्ये आज 'गोळकोंडा डायमंड्स'चा प्रयोग

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात सुरु केलेल्या नाट्य शुक्रवार उपक्रमाअंतर्गत आज 'गोळकोंडा डायमंड्स' या पुरस्कारप्राप्त नाट्यकृतीचा प्रयोग होणार आहे. आझाद मैदान येथील संघाच्या सभागृहात शुक्रवार, २२ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या या प्रयोगासाठी सर्व नाट्यरसिकांना मोफत प्रवेश असणार आहे.

महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीला प्रोत्साहन देण्यासाठी 'नाट्य शुक्रवार' हा अभिनव उपक्रम मुंबई मराठी पत्रकार संघात सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात दर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी महाराष्ट्रातील दर्जेदार प्रायोगिक नाट्याचे मोफत सादरीकरण होणार आहे. नवोदित व प्रायोगिक रंगकर्मींसाठी हे व्यासपीठ खुले असणार असून, नाट्यप्रेमींना नाट्यप्रयोगांचा नि:शुल्क आनंद घेण्याची संधी यातून मिळणार आहे.

एनसीपीएच्या नाट्यदर्पण लेखन स्पर्धेत गोळकोंडा डायमंड्सने पारितोषिक पटकावले आहे. या उपक्रमाला 'इंडियन ऑईल'चे प्रायोजकत्व लाभल्याचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी सांगितले.

## निवडक

### शिवकरमधून दागिन्यांची चोरी

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील शिवकर येथील घरातून चोरट्यांनी ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने लंपास केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १९ ऑगस्टला गुन्हा दाखल करण्यात आला. चोर रेनकोट घालून आल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

### प्रशासकीय भवनाची टाकी फुटली

**पनवेल :** पनवेल शहरातील प्रशासकीय भवनावर असलेल्या १० हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी पावसादरम्यान फुटली. एक ते दीड वर्षापूर्वी सुरू झालेल्या भवनात अपर तहसील कार्यालय तसेच मुद्रांक शुल्क विभागाचे कार्यालय कार्यरत आहे. टाकी फुटल्याने कार्यालयांत पाण्याचा तुटवडा भासणार आहे.

# भाजयुमोच्या मागणीला यश

## चिपळे येथील रस्त्यांची डागडुजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिपळे पूल ते नेरे रस्ता दुरूस्त करा आणि चिपळे येथील जेपी हॉटेलजवळ स्पीड ब्रेकर बसवण्यात यावा, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेलकडे करण्यात आली होती. त्यानुसार या कामांची कार्यवाही सुरू झाली आहे.

भाजप युवा मोर्चा पनवेल तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांनी याबाबत निवेदन दिले होते. त्यात त्यांनी म्हटले होते की, पनवेल-माथेरान रोड येथील चिपळे पूल ते जेपी हॉटेल परिसरातील चिपळे गावात प्रवेशद्वाराअगोदर स्पीडब्रेकर बसविण्यात यावे. या रस्त्यामध्ये चिपळे गावात जाण्या-येण्यासाठी जास्त वर्दळ व वाहतूक तसेच शाळेतील मुलांची ये-जा असते. शाळेतील स्कूल व्हॅन, बसेसदेखील चिपळे गावातील रस्त्यावर ये-जा करत असतात. त्यामुळे तेथे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या रस्त्यावर या अगोदर स्पीडब्रेकर होते, मात्र नवीन रस्त्यावरदेखील स्पीड ब्रेकर बसविण्यात यावे.





रस्त्यावरची वर्दळ तसेच शाळातील मुलांची वर्दळ, वयोवृद्ध नागरिकांची सततची होत असलेली मागणी लक्षात घेऊन लवकरात स्पीडब्रेकर बसवावेत तसेच मागणी मान्य न झाल्यास भारतीय जनता युवा मोर्चा यांच्या वतीने तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल व या आंदोलनास आपण सर्वस्वी जबाबदार असाल, असा इशाराही देण्यात आला होता.

यासोबतच दुसऱ्या पत्रात पनवेल-माथेरान रोड येथील चिपळे पूल ते नेरे येथील रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यामुळे वाहनाचे अपघात होत आहेत व जिवीत हानी होण्याची दाट शक्यता आहे तसेच येथील नागरिकांना दळणवळणसाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर वाहनचालकांना तारेवरची कसरत करून वाहन चालवायला लागत आहे. त्यामुळे रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी यावर जोर देण्यात आला होता. त्यानुसार कामे सुरू झाली आहेत.

## सोनसाखळीचोर पोलिसांच्या ताब्यात; मुद्देमाल हस्तगत



**पनवेल : वार्ताहर**

रबाळे पोलिसांनी सोनसाखळी खेचणाऱ्या एका सराईत चोरट्याला कोपरखैरणे परिसरातून अटक केली आहे. रोहित शिवाजी गायकवाड (२४) असे त्याचे नाव असून, त्याने घणसोली परिसरात केलेल्या सोनसाखळी चोरीच्या दोन गुन्ह्यांना उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. तसेच पोलिसांनी या दोन्ही गुन्ह्यांतील २ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत केल्याचे सांगितले आहे.

घणसोलीत राहणारी श्यामलता सिंग (३८) ही विवाहिता घणसोली सेक्टर ९ येथील खाडी ब्रिजवरून जात असताना रोहितने तिच्या छातीत जोरात बुक्का मारून गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून पोबारा केला होता. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

वपोनि. बाळकृष्ण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. अविनाश पाळदे, हवालदार प्रसाद वायंगणकर, नाईक विजय करंकाळ, प्रल्हाद जाधव व त्यांच्या पथकाने घटनास्थळ व आजूबाजूच्या परिसरातून सीसीटीव्ही व गुप्त माहिती दारांच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला.

## पनवेल येथे उद्योग सुसंवाद कार्यक्रम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे २३ ऑगस्टला जिल्हा उद्योग केंद्र रायगड व लघु उद्योग भारती रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील सर्व उद्योजकांसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत उद्योग सुसंवाद-२०२५ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, नेहा भोसले आयुक्त, पनवेल महापालिका, मंगेश चितळे उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, उद्योजक यांनी उपस्थितीत राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळया यांनी केले आहे.

## रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे वनवासी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत गेली ३५ वर्षे सातत्याने वनवासी कल्याण आश्रम चिंचवली येथील विद्यार्थी आरोग्य दत्तक योजना राबविली जात आहे त्या अंतर्गत वनवासी कल्याण आश्रम चिंचवली येथील विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर, मोफत औषधे वाटप, खाऊ वाटप, आणि तेथील १० वी च्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असे Ideal Study -Appचे वाटप करण्यात आले. उपक्रमामध्ये रोटरीची जुनी **थीम** Spreading Happiness याचा प्रत्यय आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आंनद खरोखर साठवून ठेवण्या सारखा होता.



प्रोजेक्ट चेअरमन डॉ. रमेश पटेल यांनी हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली तसेच अल्पोपहाराची खूप छान सोय केली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. डॉ. तुषार जोशी, डॉ. चंद्रात्रे, डॉ. मिलिंद घरत यांनी विध्यार्थ्यांची तपासणी करून प्रोजेक्ट यशस्वी करण्यात मोठा हातभार लावला. फार्मासिस्ट ॲन लीना घोडिंदे यांनी रो. मनोज आंग्रे यांच्या सहकार्याने औषधे वाटप करण्याची जबाबदारी छान पणे पार पाडली. बी जी पाटील यांनी या प्रोजेक्ट बद्दल उपस्थितीताना माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. झझ संतोष घोडिंदे यांनी आपल्या जुन्या आठवणी ना उजाळा दिला. ॲनस यांनी खाऊ वाटपाची जबाबदारी चोखपणे पार पाडली. दीपक गडगे आणि डॉ. मिलिंद घरत यांच्या हस्ते ॲपचे वाटप करण्यात आले.

## मोरा बंदरातील मच्छीमार बोटीमधील खलाशी बेपत्ता

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

वादळी वाऱ्यामुळे मोरा बंदरात आश्रयासाठी आलेल्या गुजराती मच्छीमार बोटीतून एक खलाशी बेपत्ता झाला आहे.भरतभाई डालकी (४४) असे या बेपत्ता खलाशाचे नाव आहे.गुजरात राज्यातील वेरावल येथील भरतभाई कचराभाई डरी यांच्या मालकीची भवानी गंगा नावाची मच्छीमार बोट वादळी हवामानाच्या इशाऱ्यानंतर सुरक्षिततेसाठी मोरा बंदरात नांगर टाकून विसावली होती.

१९ ऑगस्ट रोजी मोरा बंदरात आलेल्या या मच्छीमार बोटींवर ६ खलाशी व एक तांडेल असे एकूण सात जण होते.पैकी भरतभाई डालकी हा खलाशी शौचालयाला गेला होता.बराच वेळ झाला तरी बोटीवर दिसून आला नसल्याने त्याचा शोध घेतला मात्र कुठेच आढळून आला नाही.त्यामुळे मोरा सागरी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली असल्याची माहिती वपोनि सुर्यकांत कांबळे यांनी दिली.

दरम्यान याप्रकरणी पोलिस व सागरी सुरक्षा रक्षक दलाच्या सदस्यांना बेपत्ता खलाशाचा शोध घेण्याच्या घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.तसेच गुजराती बोटीवरील खलाशी व तांडेल यांनाही सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे सुचना देण्यात आल्या असल्याची माहिती रायगड मत्स्यव्यवसाय विभागाचे सहआयुक्त संजय पाटील यांनी दिली.





**पनवेल : शहरामध्ये नव्याने महाराष्ट्र पार्लर आणि एम.एस. टेलर्स व्यवसाय सुरू झाले आहेत. या व्यवसायांच्या दुकानांचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी झाले. या वेळी त्यांनी महाराष्ट्र पार्लरचे मालक सुरेंद्र ठाकूर आणि एम.एस. टेलर्सचे मालक बच्चू शहा यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. भाजपचे पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, युवा नेते मयुरेश खिस्मतराव, राजू चौधरी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**



**पनवेल : खारघरमध्ये पावसाळ्यात रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्ता तातडीने दुरुस्त करण्यासाठी भाजप खारघर मंडळाच्या शिष्टमंडळाने पनवेल महानगरपालिकेला निवेदन सादर केले. यावेळी भाजप खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, महिला मोर्चा शहराध्यक्ष अध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, मंडळ उपाध्यक्ष दत्ता ठाकूर, युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय लोखंडे, युवा मोर्चा उपाध्यक्ष प्रवीण बेरा उपस्थित होते.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे संशोधन भेट कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागाने प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता संशोधन भेट कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा 'संशोधन भेट कार्यक्रम' रयत शताब्दी नवोपक्रम व उष्मायन संस्था खारघर, नवी मुंबई यांच्याशी झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत आयोजित करण्यात आला होता.



या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी स्टार्टअप्सच्या कार्यपद्धती, उद्योजकतेची मुलतत्त्वे, तसेच सायबर सुरक्षा यासारख्या महत्त्वाच्या विषयांबाबत सखोल माहिती मिळवली. या अनुभवामुळे विद्यार्थ्यांना उद्योगजगताची प्रत्यक्ष झलक मिळाली असून, त्यांचे व्यावसायिक ज्ञान व भविष्यासाठीची तयारी निश्चितच बळकट होईल. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी व शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध करणारा ठरला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल मॅनेजमेंट स्टडीज विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांचे अभिनंदन केलेल्या उपक्रमांचे आयोजन प्रा. डॉ. रीत ठुले विभाग प्रमुख मॅनेजमेंट स्टडीज यांनी केले शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी उपस्थित होते.



**पनवेल : अमेय सुमंत नलावडे या विद्यार्थ्याला एमसीए उच्च शिक्षणासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून एक लाख रुपयाची आर्थिक मदत करण्यात आली आहे. मदतीचा धनादेश श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी उपस्थित होते.**

## ढोल-ताशा पथकांचा सराव अंतिम टप्प्यात

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाचे आगमन आता अवघ्या काही दिवसांवर आले आहे. त्यामुळे पनवेल परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. गणेशोत्सवासाठी पनवेल , नवीन पनवेल , करंजाडे , कामोठे , खांदा वसाहत या भागांतील विविध गणेशोत्सव मंडळे तयारीला लागली आहेत. तर दुसरीकडे गणेशाचे आगमन व विसर्जन करतेवेळी गणेशभक्तांना तालात ठेका धरण्यास भाग पाडणारी ढोल-ताशा पथकांनी आपला सराव जोरात सुरू केल्याचे दिसून येत आहे.



पनवेल परिसरातील विविध उड्डाणपुलांखाली, मोकळ्या जागा, काही ठिकाणच्या मैदानात ही ढोल-ताशा पथके आपल्या सहकाऱ्यांसह सकाळ-संध्याकाळ येथे सराव करताना दिसत आहेत. ही पथके ढोल-ताशा, झांज यांचा एक विशिष्ट ताल धरण्यासाठी गेल्या महिन्याभरापासून सराव करत आहेत. त्यासाठी काही पथकांना यंदा नवीन वाद्यसामग्री खरेदी केल्याचे पहायला मिळत असून, त्यातून ते पारंपरिक व आधुनिक तालांचा संगम साधण्याचा प्रयत्न करत आहेत. गणेशोत्सवात भव्य मिरवणुका, आगमन व विसर्जन सोहळ्यात ढोल-ताशांचा गजर महत्त्वाचा मानला जातो. ढोल-ताशांचा गजर नसेल तर गणरायाचे आगमन आणि विसर्जन काय कामाचे, असे सारी गणेश मंडळा मानतात. त्यामुळे सर्वोत्तम वादन करणाऱ्या ढोल-ताशा पथकांच्या शोधात गणेश मंडळ असतात. त्यांच्या कानावर आपल्या सरावाचा ठेका पडावा व गणरायाच्या आगमनाची व विसर्जनाची ऑर्डर आपल्याला मिळावी, यासाठी ही ढोल-ताशा पथके अधिकाधिक सराव करत असल्याचे वास्तव पनवेल परिसरात ठिकठिकाणी समोर येत आहे.

सरावाचा ताल कानावर पडू लागताच आजूबाजूचे नागरिक तेथे गर्दी करताना पहायला मिळत आहेत.

# सुधागडात जीव धोक्यात घालून वीजपुरवठा केला सुरू



## महावितरणच्या कर्मचाऱ्याचे धाडस

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड पाली परिसरात अतिवृष्टीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून पुन्हा सुरू केला आहे. ट्यूब-बोटीच्या साहाय्याने पाण्यात उतरून त्यांनी दुरुस्ती केली आणि अखेर परिसरात वीजपुरवठा पूर्ववत करण्यात यश मिळाले.

सुधागड तालुक्यातील पाली परिसराचा वीजपुरवठा अतिवृष्टीमुळे खंडित झाला होता. पहाटे साडेदोन वाजता २२०/२२ केव्ही कानसई ईएचव्ही उपकेंद्रातून येणारा २२ केव्ही टेंभी इनकमर ट्रिप झाल्याने टेंभी स्विचिंग उपकेंद्रावरील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला.

घटनेनंतर महावितरण कर्मचाऱ्यांनी तात्काळ लाईन पॅट्रोलिंगचा प्रयत्न केला. मात्र, अंबा नदीवरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह असल्याने दुरुस्ती विलंबली. सकाळी पाणी ओसरल्यानंतर कर्मचाऱ्यांनी घोडसई ए.बी. स्विचपर्यंत लाईन चार्ज केली.

यानंतर वझरोली भागात खोल पाणी असल्याने थेट प्रवेश कठीण झाला. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांनी वाहनांच्या ट्यूबसद्वारे तात्पुरती नाव तयार केली. त्या साहाय्याने ए.बी. स्विच ऑपरेट करून वझरोलीपर्यंत लाईन चार्ज करण्यात यश मिळाले.

पुढील तपासणीदरम्यान तामसोली येथे इन्सुलेटर दोषयुक्त असल्याचे आढळले. जवळपास सात ते आठ फूट पाणी साचलेल्या स्थितीत कर्मचाऱ्यांनी पुन्हा ट्यूब-बोटीच्या मदतीने दोषयुक्त इन्सुलेटर बदलला आणि अखेरीस फीडरचे दुरुस्तीकार्य पूर्ण केले.

पूरस्थितीत जीवाचा धोका पत्करून केलेल्या या कार्यामुळे संपूर्ण फीडर यशस्वीरित्या चार्ज झाला असून, परिसरातील वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. महावितरण कर्मचाऱ्यांचा हा धाडसी प्रयत्न व जनतेप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित झाली आहे.

# राजाभाऊ कोठारी यांच्यासह जिल्ह्यातील चार रक्तदात्यांचा महारक्तवीर पुरस्काराने दिल्लीत सन्मान

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन च्या वतीने कर्जतचे सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, पनवेलचे विजय तांबोळी, कैलास पोटे आणि सतीश पिंपरे यांचा ५० पेक्षा जास्त वेळा रक्तदान केल्याबद्दल महा रक्तवीर पुरस्कार देऊन उप राज्यपालांच्या हस्ते दिल्ली येथे सत्कार करण्यात आला. कोठारी यांनी आज पर्यंत १०९ वेळा रक्तदान केले आहे. तर ५२० रक्तदान सही शिबिरांचे आयोजन करून एकूण ६७ हजार ७७९ रक्त बाटल्या संकलित केल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन च्या वतीने दिल्ली येथील हॉटेल अशोका मध्ये महा रक्तवीर पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी १०० पेक्षा जास्त वेळा रक्तदान करणारे कर्जतचे राजाभाऊ कोठारी, पनवेलचे विजय तांबोळी तसेच ५० पेक्षा जास्त वेळा रक्तदान करणारे कैलास पोटे आणि सतीश पिंपरे यांचा लडाखचे उप राज्यपाल कविंद्र गुप्ता यांच्या हस्ते महा रक्तवीर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी व्यासपीठावर राज्यसभेचे खासदार नरेश बंसल (उत्तराखंड), अशोक मित्तल (पंजाब), श्रीमती धर्मशिला गुप्ता, (बिहार), सुजित कुमार (ओडिशा), रामेश्वर तेली (आसाम), लोकसभेचे खासदार दामोदर अग्रवाल (राजस्थान), सुधीर गुप्ता (मध्यप्रदेश), डॉ. संजय जयस्वाल (बिहार), अतुल गर्ग (उत्तरप्रदेश), ब्रिजमोहन अग्रवाल (छत्तीसगड), सुदामा प्रसाद (बिहार), मन्नालाल रावतजी (उदयपूर) आदी उपस्थित होते. याप्रसंगी शंभर पेक्षा अधिक रक्तदान करणाऱ्या एकूण १५ रक्तदात्यांना महारक्तवीर व पन्नासपेक्षा अधिक रक्तदान करणाऱ्या ५२ रक्तदात्यांना रक्तवीर म्हणून सन्मानित करण्यात आले. यामध्ये रायगड जिल्ह्यातील चार रक्तदात्यांचा समावेश होता.

# नागोठण्यात श्री संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथी साजरी

**नागोठणे : बातमीदार**

मी वारीला गेलो म्हणजे विशेष काही केले नाही. वारीचे आपल्या नाभिक समाजावर फार उपकार आहेत. त्या उपकाराची जाणीव ठेऊन आपण सर्वांनी वारीला योगदान दिले पाहिजे. वारीने आपल्याला कीर्तनकार, प्रवचनकार , माळकरी, टाळकरी तसेच धारकरी देखील दिले आहेत आणि त्यांचा योग्य उपयोग करून घेणारे छत्रपती शिवाजी महाराज देखील या वारीने आपल्याला दिलेले आहेत. वारीमुळेच समाज जिवंत असल्याचे प्रतिपादन नागोठणे ग्रामपंचायतचे माजी सदस्य नाभिक समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विवेक रावकर यांनी केले.

नाभिक समाजाचे थोर संत श्री संत शिरोमणी सेना महाराज यांची पुण्यतिथी बुधवार दि. २० ऑगस्ट रोजी समाजाचे आधारस्तंभ भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणातील श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात नागोठणे विभाग नाभिक संघ, महिला आघाडी व संत सेवा मंडळ नागोठणे यांच्या वतीने साजरी करण्यात आली. आषाढी एकादशी निमित्त प्रथमच नागोठणे पंढरपूर पायी वारी विवेक रावकर यांनी केली त्याबद्दल नाभिक समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी उपस्थित समाज बांधवांशी संवाद साधताना विवेक रावकर बोलत होते.



या वेळी हभप विजय महाराज शहासने, हभप गजानन महाराज बलकावडे यांच्या सह नाभिक संघ नागोठणे विभाग अध्यक्ष बाळासाहेब टके, उपाध्यक्ष मिलिंद गुजर, कार्याध्यक्ष शैलेश रावकर, शहर अध्यक्ष सुधाकर निंबाळकर, खजिनदार रविंद्र टके, सचिव दिगंबर खराडे, उदंड रावकर, हरीशभाई टके, शैलेश रावकर, शामकांत नेरपगार, महेंद्र माने, मंगेश गायकवाड, अ‍ॅड. श्रीकांत रावकर, मनोज टके, पंकज टके, जयेश टके, अ‍ॅड. रमेश जाधव, महेंद्र पवार, विवेक रावकर, जितेंद्र जाधव, संजय टके, विजय टके, संतोष माने, दीपक पवार, राजेंद्र माने दिपाली टके, महिला आघाडी अध्यक्षा कल्पना टके, मनिषा टके, दर्शना खराडे, आदिंसह समाज बांधव व भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# तळा येथे जागतिक डास दिवस साजरा



**तळा : प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य.केंद्र तळा येथे जागतीक डास दिनाच्या निम्मित्ताने तसेच कायाकल्प अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र तळा, महागाव व मांदाड यांची मुल्यांकन करण्याबाबत जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अश्विनी सपकाळ, तालुकाआरोग्य अधिकारी तळा डॉ. वंदनकुमार पाटील, वैद्यकीय अधिकारी तळा डॉ. गजेन्द्र मोधे वैद्यकीय अधिकारी तळा डॉ. संदीप होनसांगडे वैद्यकीय अधिकारी महागाव डॉ. कुणाल मनवल तसेच A.D.M.O अनिल हावरे HA THO.गणेश भांबू, वैभव कदम ,नरेश नांदगांवकर ,निलेश कार्लेकर , अजय चौधरी, आदीसह आरोग्य सेवक/सेविका सर्व समुदाय अधिकारी आणि आशा सेविका कार्यक्रमास उपस्थित होते

या कार्यक्रमाच्या निम्मित्ताने जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.अश्विनी सकपाळ यांनी जागतीक डास दिनाबाबत डास आळी प्रतिबंधात्मक मार्ग दर्शन केले हिवतापाचे जनक संशोधन करणारे रोनाल्ड रॉस यांनी केलेल्या संशोधन संदर्भात माहीती दिली तसेच प्रा.आ. केंद्र तळा भेट दिली त्याप्रसंगी जिल्हा हिवताप अधिकारी यांनी कायाकल्प अंतर्गत स्वच्छतेची पहाणी केली व समाधान व्यक्त केले.

# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण समितीवर सनी सोगावकर

**मुरुड : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिराचे प्रेसिडेंट लायन सॅमसन उर्फ सनी सोगावकर यांची राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत मुरुड तालुकास्तरीय टीबी फोरम समितीवर सदस्यपदी नेमणूक करण्यात आली आहे .

नियुक्ती पत्र प्राप्त होताच लायन्स क्लबच्या माध्यमातून तालुक्यातील दहा टीबी ग्रस्त रुग्णांना पुढील सहा महिन्याचे पौष्टिक अन्न पुरविण्यासाठी ३६ हजार रुपये देण्यात येणार असूनहा खर्च प्रेसिडेंट सह त्यांच्या मित्रमंडळी कडून देण्यात येणार असल्याची माहिती समितीने दिली . तसेच लायन मकरंद कर्णिकट यांनी एक महिन्याचे पौष्टिक अन्न दहा रुग्णांना दिले

# खोपोलीत पाताळगंगा नदी पुजनासह एकत्रित वाढदिवस होणार साजरा

**खालापूर : प्रतिनिधी**

सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या सहज सेवा फाउंडेशन तर्फे खोपोली येथे महिलांसाठी आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दर महिन्याला वाढदिवस असणाऱ्या महिलांचा पाताळगंगा नदीकिनारी नदी पुजन व आरतीनंतर सामूहिक वाढदिवस सोहळा साजरा केला जाणार आहे.

विशेष म्हणजे, कार्यक्रमात लकी ड्रॉद्वारे विजेत्या महिलेस पैठणी साडी बक्षीस म्हणून देण्यात येईल.

महिलांच्या सामाजिक सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी या उपक्रमाची आखणी करण्यात आली असून, फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी या नवीन प्रयोगाबाबत उत्साह व्यक्त केला आहे.

या उपक्रमासाठी महिला अध्यक्षा निलम पाटील, सह सचिव नम्रता परदेशी, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, युवा अध्यक्षा सागरिका जांभळे आणि मार्गदर्शिका सीमा त्रिपाठी कार्यरत असुन उपक्रम प्रमुख म्हणून कल्याणी साखरे, दमयंती कोळी, मनीषा नरांगळे, गुरप्रीतकौर विहाल, हरजिंदरकौर धंजल, प्रविणा बुटाला, आशा फावडे, अरुणा घावटे, सुजाता यादव, कमल चौधरी, वेदा साखरे,सीमा पाटील, मुस्कान सय्यद, निलम समेळ, अंजली शर्मा, संगिता शुक्ला, रेखा भालेराव व सीमा विचारे सक्रिय आहेत.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**शहर अभियंता विभाग**

**ई-निविदा सूचना**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प.क्र.४०४/४११/२०२५ दिनांक : २१ /०८/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government/ Government Under Taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/६३/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती - ब, रोडपाली आदिवासी वाडी येथे अंतर्गत रस्ते व नाला बांधणे. | ३६,८७,३१८.५५/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०१/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त -I**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर सूचना देण्यात येते की, निरज विश्वनाथ खोचर व रिथू निरज खोचर यांच्या मालकीचे प्रत्यक्ष ताबेकब्जातील मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद शेतजमिन मिळकत आमचे अशिल हे कायमस्वरूपी विकत घेणार आहेत.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड**

| गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| जुना गट क्र. १११ | १ | एकूण क्षेत्रफळ २-७४-०० या जमिनीपैकी | १.७५ |
| नवीन गट क्र. ८२ | १ | २-४०-०० | १.५३ |

तरी सदरहू मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपाआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखीपुराव्यासहीत आपल्या हरकती नोंदवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत हे सर्व लोकांस कळावे.

दिनांक : २१/०८/२०२५
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**आनंद वाय. धोंगडे**
ॲडव्होकेट
१०३, ए विंग, निल रिद्धी एमरलॅण्ड, प्लॉट नं. ५२७, तहसील ऑफिसजवळ, पनवेल. मोबाईल नं. ७५०६४९८५०३



जा.क्र. :- २३१९ **सहा.निबं.पनवेल,ता.पनवेल/कलम १०१/सुनावणी नोटीस/२०२५**
**स. निबंधक, सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड, यांचे कार्यालय, पहिला माळा, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकारनगर, रायगड बाजारच्या बाजुला, पनवेल, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये सुनावणी नोटीस )

ज्या अर्थी श्री कुलस्वामी को-ऑप क्रेडिट सोसा. लि. कामोठे यांनी दि. १८/०६/२०२५ रोजी तुमचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुलीचा दाखला मिळणेबाबत रितसर अर्ज या कार्यालयाकडे दाखल केला असुन त्या संबधी सुनावणी दि. ०७/०७/२०२५ दि. २८/०७/२०२५ व दि. १८/०८/२०२५ रोजी स. ११.३० वाजता ठेवण्यात आल्याची नोटीस अपणास रजिस्टर पोष्टाने दिली होती, सदर नोटीस अपुर्ण पत्ता अथवा नोटीस मिळुनही आपण हजर राहीला नाही.

संस्थेच्या दप्तरी आपला नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने आपणांस या जाहीर नोटीसाद्वारे एक संधी देण्यात येत असुन कळविण्यात येते की, सदर प्रकरणी अंतीम सुनावणी दि. १५/०९/२०२५ रोजी स. ११.३० वाजता मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड यांचे कार्यालयात होणार आहे, तरी सदर दिवशी आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वत: किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत हजर रहावे. या कामी आपण गैहजर राहिल्यास आपणास या बाबत काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरून आपल्या अनुपस्थितीत वादी संस्थेला दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

| अनु क. | दावा क्रमांक | थकबाकी कर्जदाराचे नाव | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | ३११/२०२५ -२०२६ | श्री. कृष्णा भास्कर मोढवे (कर्जदार)<br>श्री. प्रदिप विलास महाडीक<br>श्री. सुनिल तुकाराम मुनानकर | माझगाव डॉक शिपबिल्डर्स लि. डॉकयार्ड रोड, माझगाव मुंबई - ४०००१० | ९४,२३३/- |
| २ | ३१२/२०२५ -२०२६ | श्री. रामदास माणिक गायकवाड (कर्जदार)<br>श्री. जीवन राम गायकवाड<br>सौ. सुंधती रामदास गायकवाड | घर नं.५०६२-२,लिंगेश हाऊस हनुमान नगर, तुर्भे, नवी मुंबई ४००७०५ | १,१३,१०७/- |
| ३ | ३१३/२०२५ -२०२६ | सौ. श्री. सुंधती रामदास गायकवाड (कर्जदार)<br>श्री. जीवन राम गायकवाड<br>श्री. रामदास माणिक गायकवाड | घर नं.५०६२-२,लिंगेश हाऊस हनुमान नगर, तुर्भे, नवी मुंबई ४००७०५ | ९१,८०९/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.
स्थळ : पनवेल
दिनांक : २०/८/२०२५

शिक्का

**सही /-**
**(श्रीम. भारती काटुळे)**
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था पनवेल, जि.रायगड



जा.क्र. :- २३१८ **सहा.निबं.पनवेल,ता.पनवेल/कलम १०१/सुनावणी नोटीस/२०२५**
**स. निबंधक, सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड, यांचे कार्यालय, पहिला माळा, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकारनगर, रायगड बाजारच्या बाजुला, पनवेल, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये सुनावणी नोटीस )

ज्या अर्थी श्री कुलस्वामी को-ऑप क्रेडिट सोसा. लि. पनवेल यांनी दि. १८/०६/२०२५ रोजी तुमचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुलीचा दाखला मिळणेबाबत रितसर अर्ज या कार्यालयाकडे दाखल केला असुन त्या संबधी सुनावणी दि. ०७/०७/२०२५ दि. २८/०७/२०२५ व दि. १८/०८/२०२५ रोजी स. ११.३० वाजता ठेवण्यात आल्याची नोटीस अपणास रजिस्टर पोष्टाने दिली होती, सदर नोटीस अपुर्ण पत्ता अथवा नोटीस मिळुनही आपण हजर राहीला नाही.

संस्थेच्या दप्तरी आपला नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने आपणांस या जाहीर नोटीसाद्वारे एक संधी देण्यात येत असुन कळविण्यात येते की, सदर प्रकरणी अंतीम सुनावणी दि. १५/०९/२०२५ रोजी स. ११.३० वाजता मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड यांचे कार्यालयात होणार आहे, तरी सदर दिवशी आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण स्वत: किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत हजर रहावे. या कामी आपण गैहजर राहिल्यास आपणास या बाबत काहीही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरून आपल्या अनुपस्थितीत वादी संस्थेला दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

| अनु क. | दावा क्रमांक | थकबाकी कर्जदाराचे नाव | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | २९८/२०२५ | श्री.मुबीन अफजल खान (कर्जदार)<br>श्री. अकबरखान अफजलखान पठाण<br>श्री. इरफानखान सत्तार खान<br>श्री. रफीकखान सत्तारखान पठाण | रुम नं. ३०३, भुसार मोहल्ला, मेहमुद पॅलेस, ३ रा माळा, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ | ९५,०२५/- |
| २ | २९६/२०२५ | सौ. सविता किरण चासकर (कर्जदार)<br>श्री. अतुल म्हस्कु कटके<br>श्री. निलेश बबन बारवे | मु पो चास कडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे. ४१०५१५ | १,१६,५७४/- |
| ३ | २९५/२०२५ | श्री. अकबरखान अफजलखान पठाण (कर्जदार)<br>श्री. इरफानखान सत्तार खान<br>श्री. रफीकखान सत्तारखान पठाण<br>श्री. मुबीन अफजल खान | रुम नं. २०३ व २०४, भुसार मोहल्ला,मेहमुद पॅलेस, २ रा माळा, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ | ९९,३६१/- |
| ४ | २९७/२०२५ | श्री. विकास ओमप्रकाश गुप्ता (कर्जदार)<br>श्री. युवराज महादेव थोरात<br>श्री. वसंत माणिक आमटे | हरे माधव हौ सोसा, रुम नं. बी/३०२ बी विंग, ३ रा माळा, उरण नाका, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६ | ९१,१५४/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.
स्थळ : पनवेल
दिनांक : २०/८/२०२५

शिक्का

**सही /-**
**(श्रीम. भारती काटुळे)**
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था पनवेल, जि.रायगड

# नवी मुंबई महानगरपालिकेची शून्य प्लास्टिक क्षेपणभूमीकडे वाटचाल





**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका आणि प्रोजेक्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ‘घरोघरी तिरंगा, घरोघरी स्वच्छता’ या अभियानांतर्गत ‘प्रत्येक घर – प्लास्टिकमुक्त’ या संकल्पनेवर आधारित विशेष उपक्रम भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून राबविण्यात आला. या मोहिमेत शाळा, सोसायट्या, कार्यालये आणि विविध संस्थांमधील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत हा उपक्रम यशस्वी केला.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार ‘प्लास्टिकमुक्त नवी मुंबई’ ही संकल्पना लोकसहभागातून प्रत्यक्ष साकारण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात येत असून त्या अनुषंगाने संपूर्ण नवी मुंबई क्षेत्रात दोन्ही परिमंडळांमध्ये अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

महानगरपालिकेच्या प्लास्टिक संकलनासाठी बनवलेल्या विशेष वाहनाद्वारे १४ संकलन केंद्रावरून संकलित करण्यात आलेले १४१ कि.ग्रॅ. प्लास्टिक एकत्रित करण्यात आले. हे प्लास्टिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्पस्थळी न जाता पुनर्प्रक्रियेद्वारे उपयुक्त वस्तूंमध्ये बदलले जाणार आहे. या वस्तू पुढील काळात सार्वजनिक ठिकाणी वापरासाठी उपलब्ध होणार आहेत.

‘प्रत्येक घर – प्लास्टिकमुक्त’ या उपक्रमाला विद्यार्थी आणि नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे या मोहिमेचे खास वैशिष्ट्य ठरले. ‘प्लास्टिकमुक्त नवी मुंबई’ या उद्दिष्टाकडे वाटचाल करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग त्यांच्या मनावर प्लास्टिकचा वापर टाळण्याचा संस्कार करणारा असल्याने शहराच्या पर्यावरणपूरक भविष्यासाठी हा उपक्रम महत्वाचा असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

नवी मुंबई महापालिका आणि प्रोजेक्ट मुंबई यांच्या सहयोगाने आता दर आठवड्याला नियमितपणे ‘प्लास्टिक आणि ई-कचरा संकलन मोहीम’ राबविण्यात येणार आहे. ‘शून्य प्लास्टिक व ई-कचरा क्षेपणभूमी’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी हा उपक्रम स्वातंत्र्यदिनापासून प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आलेला आहे.

गृहनिर्माण संस्था, सोसायट्या, शाळा, कार्यालये आणि इतर संस्थांनी या मोहीमेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी इच्छुकांनी प्रोजेक्ट मुंबई संस्थेशी किंवा महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संपर्क साधावा तसेच नागरिकांनीही आपल्या घरातील स्वच्छ आणि कोरडे प्लास्टिक दर गुरुवार व शुक्रवार आपल्या नजिकच्या महानगरपालिका विभाग कार्यालयातील घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वच्छता अधिकारी अथवा स्वच्छता निरीक्षक यांचेकडे जमा करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या वतीने प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी स्वतंत्रता दिवस निमित्त राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कला शिक्षकांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ह्या स्पर्धेसाठी स्वतंत्रता दिवस हा विषय देण्यात आला होता. महाराष्ट्र राज्यातून या स्पर्धेला खूप चांगला प्रतिसाद लाभला होता. सर्व विजय स्पर्धकांना ७ सप्टेंबर रोजी कामोठे, नवी मुंबई येथे कार्यक्रमांमध्ये सन्मानचिन्ह/ सन्मानपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून राधिका कुसुरकर वाघ डॉ. गजानन शेपाळ मनोहर एस.बाविस्कर, (कलाशिक्षक / चित्रकार ( फळा तेथे शाळा/ सुयश चित्रकला पुस्तकाचे लेखक ) यांनी केले. असेच संस्थेच्या अध्यक्षा मेघा महाजन यांनी या वेळी बोलताना सांगितले. तसेच पुढील विजयी स्पर्धकांचा निकाल त्यांनी जाहीर केला.

स्पर्धेचा निकाल

प्रथम पारितोषिक नरेंद्र हिरामण भुसारे; द्वितीय पारितोषिक सुनिल प्रकाश भोसले; तृतीय पारितोषिक घनश्याम प्रकाश बोरसे / चित्रसेन वासुदेव पागधरे; उत्तेजनार्थ पारितोषिक दिनेश शंकर रिकामे, दाभाडे सुनिल आनंदा, विठ्ठल दत्तात्रय काकडे, सिराज हैदर तडवी, अर्जुन सरस्वती धाकु माचिवले, अमरसिंग टेंबऱ्या वसावे, बाबुलाल मंगतू जाधव, दत्ताराम रामचंद्र कोकरे, मेघा प्राणजीत बोरसे, मुरलीधर के.कुंभार, नरेंद्र दादाजी साबळे, शंकर रामचंद्र सोनावणे, विजय काशिनाथ सूर्यवंशी, दिनेश नामदेव सूर्यवंशी सर्व विजय स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

## गावठाण जमीन हक्कासाठी नेरुळ गाव उभारणार लढा

**नवी मुंबई: बातमीदार**

नेरुळ गाव- गावठाणातील घरे अनधिकृत ठरवून ती निष्काशीत करण्याची जाहिरात नुकतीच वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याने नवी मुंबईतील भूमिपुत्रांमध्ये संतापाची लाट पसरली असून या विरोधात तीव्र लढा उभारण्यासाठी नेरुळ गावातील ग्रामस्थांची बुधवारी एक बैठक झाली.

सिडकोने पन्नास वर्षे फक्त शहरांच्या विस्ताराचा व विकासाचाच विचार केला. येथील गावठाणांचाही असाच सकारात्मक विचार करुन येथील गावठाणांचे वेळोवेळी सीमांकन केले असते तर येथे 'अनधिकृत'चा प्रश्नच निर्माण झाला नसता असे यावेळी ग्रामस्थांचे म्हणणे होते. या ग्रामसभेत नेरुळ गावातील मूळ गावठाण व विस्तारीत गावठाणाचा लोक वर्गणीतून सिटी सर्वे करणे, गाव – गावठाण जमीन हक्क समिती स्थापन करणे व नवी मुंबई महानगर पालिकेच्या विकास आराखड्या विरोधात आवश्यकते नुसार हरकती व सुचना नोंदविणे असे बहुमताने तीन ठराव संमत करण्यात आले.गावठाण जमीन हक्क हा केवळ नेरुळ गावचाच विषय नसून संपूर्ण नवी मुंबईतील भूमीपुत्रांचा विषय आहे. त्यामुळे या विषयाची जनजागृती संपूर्ण नवी मुंबईभर करुन जमीन हक्काचा हा लढा अधिक तीव्र करणार असून विकास आराखड्या विरोधात आवश्यकते नुसार हरकती व सूचना नोंदविणार आहेत

## प्रवासी संघटनेमार्फत पनवेल आगाराला ५० झाडे

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील केळवणे ते पनवेल येथे नोकरी व रोजगाराच्या निमित्ताने नियमित प्रवास करणाऱ्या ग्रामीण भागातील प्रवाशांमार्फत पनवेल एसटी आगाराच्या सुशोभीकरणासाठी, ग्रामीण प्रवासी संघटनेच्या अध्यक्षा जयवंती गोंधळी यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच ५० शो ची फुलझाडे देण्यात आली.



या वेळी पनवेल आगाराचे वाहतूक नियंत्रक श्री म्हात्रे, वाहतूक नियंत्रक सतीश नलावडे, वाहतूक नियंत्रक पूजा खेडेकर, वाहक एस आर राठोड, चालक जी.एम. गायकवाड, वाहक ए. ए. ढेरे, चालक जी.पी. सकपाळ, वाहक अर्जुन ढेरे, चालक अर्जुन बनसोडे यांच्यासह प्रवासी संघटनेचे नियमित प्रवासी तथा संघटना प्रमुख जयवंती गोंधळी, आशीर्वाद पाटील, प्रतिभा पाटील, रचना म्हात्रे, रूपाली गावंड, हर्षदा घरत, अंजली भोईर, प्रभाकर भोईर, मनस्वी गिरवाडकर, अंकिता ठाकूर, श्वेता कडू, कामिनी गायकवाड, राजश्री पाटील, मयुरी ठाकूर, पूनम म्हात्रे, शुभम पाटील, सिद्धी घरत, नमिता म्हात्रे, तेजस जोशी, स्नेहा जाधव, अरुणा तांडेल, मेघा ठाकूर, शोभा पाटील, समता पाटील, गीतांजली पाटील, किसन ठाकूर, अदिती पाटील, दयाराम म्हात्रे, स्वानंद नवाळे, नाना पाटील, सानिका चौलकर, सागर पोवळे, चेतन पोवळे, समीर गावंड,अजय म्हात्रे, कविता पाटील, मिलिंद नवाळे, सपना पाटील, नरेंद्र ठाकूर, तेजश्री पाटील, धीरेंद्र कुमार तसेच अन्य प्रवासी नागरिक उपस्थित होते.

पनवेल आगाराची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हि शोची फुलझाडे देण्यात आली असल्याची माहिती प्रवासी संघटनेच्या अध्यक्षा जयवंती गोंधळी यांनी दिली.

## पनवेल शहर पोलिसांमार्फत दंगा काबूची रंगीत तालीम

**पनवेल : वार्ताहर**

आगामी गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद सण-उत्सवाचे अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत आज पाडा मोहल्ला मस्जिद मुसलमान नाका पनवेल या ठिकाणी दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.



दंगा काबू योजनेत पनवेल शहर पोलीस ठाणेकडील वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोनि, ७ सपोनि, पोउपनि, ४२ अंमलदार, बीट मार्शल १,२,३ वरील अंमलदार, मोबाईल १ वरील अंमलदार, डीपी पथकाकडील ६ अंमलदार, झोन ३ स्ट्राइकिंगसह १ अधिकारी ०९ अंमलदार, फायर बिग्रेड गाडीसह ०१ अधिकारी ०५ अंमलदार, पनवेल मनपा कडील २ रुग्णवाहिका स्टाफ सह हजर होते. दंगा काबू योजना संपल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील नाकाबंदी करण्यात आली होती.

## मोरबे धरण भरल्याने नवी मुंबई जलसंपन्न

**नवी मुंबई ,चौक: बातमीदार**

मागील सहा दिवसांपासू सुरू असलेल्या संततधार पर्जन्यवृष्टीमुळे नवी मुंबई महानगरपालिकेचे मोरबे धरण पूर्ण क्षमतेने १०० टक्के भरले असून २० ऑगस्ट रोजी पहाटे ३.१० वा. ११२३ क्यूसेक पाणी विसर्ग करण्यात आला. आहे. निसर्गाच्या कृपेने नवी मुंबईला लाभलेल्या या जलसंपन्नतेबद्दल आनंद व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन केले आहे.



स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर स्वत:च्या मालकीचे धरण असणारी नवी मुंबई ही एकमेव महानगरपालिका असून मोरबे धरणामुळे नवी मुंबई ही जलसमृध्द महानगरपालिका म्हणून ओळखली जाते. पाताळगंगा नदीची उपनदी असलेल्या धावरी नदीवर खालापूर तालुक्यात असलेल्या ४५० द.ल.लि. प्रतिदिन क्षमता असलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरण परिसराच्या पाणलोट क्षेत्रात मागील सहा दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असून बुधवार दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ३.१० वाजता मोरबे धरणाचे १२ मी. ÷ ३ मी. आकाराचे दोन्ही वक्राकार दरवाजे २५ सेंटिमीटरने उघडण्यात आले व ११२३ क्युसेक पाण्याचा विसर्ग धावरी नदीच्या पात्रात सोडण्यात आला. मोरबे धरण क्षेत्रात रात्रीपासून पावसाचे प्रमाण वाढलेले असून दुपारपासून ३११४ क्यूसेक विसर्ग करण्यात येत आहे.

मागील वर्षी २९ ऑगस्ट २०२४ रोजी मोरबे धरण १०० % भरले होते.

## नमुंपाची मालमत्ता हस्तांतरण शुल्क आकारणी अधिक पारदर्शक

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेने मालमत्ता हस्तांतरण शुल्क आकारणीच्या धोरणात महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केल्या आहेत. आर.बी. आय. लेडींग रेट, विलंब शुल्क आणि इतर तांत्रिक बाबींमध्ये बदल करून, शुल्क आकारणी अधिक पारदर्शक व नागरिकांसाठी सोयीस्कर करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश महापालिका कर विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांनी काढले आहेत. या बदलांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येणार असून, विलंब शुल्क आकारणीची नवी तरतूद १ ऑक्टोबर २०२५



पासून लागू होईल.

नागरिकांना मालमत्ता हस्तांतरण प्रक्रियेत पारदर्शकता व स्पष्टता असावी हा या सुधारणांचा उद्देश आहे. सुधारित धोरणामुळे हस्तांतरण शुल्क निश्चित करण्यासाठी स्पष्ट गणिती पद्धती लागू होईल. ही तरतूद १ ऑक्टोबरपासून लागू करण्यामागील उद्देश नागरिकांना वेळेत प्रक्रिया पूर्ण करण्याची संधी देणे हा आहे, असेही महानगरपालिकेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

नोंदणीकृत खरेदीखत, विक्री, बक्षिसपत्र यासारखे दस्त ज्यामध्ये नोंदणी व मुद्रांक विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत संबंधित मिळकतीची प्रचलित बाजारभावाच्या मूल्यांकनावर आधारित किंमत ठरवून, त्या किंमतीवर मुद्रांक शुल्क घेतले जाते. अशा प्रकरणी दस्तऐवजामधील नमूद मोबदल्याच्या ०.२०% किंवा नोंदणी व मुद्रांक विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून त्या – त्या वर्षाकरीता निश्चित केलेल्या बाजारमूल्य दरपत्रकावरुन म्हणजेच बाजारमूल्य दरपत्रकातील दर द मालमत्तेचे क्षेत्रफळ द ०.२०% यानूसार अनुज्ञेय होणारे हस्तांतरण शुल्क यापैकी जे जास्त असेल ते हस्तांतरण शुल्क आकारण्यात यावे.

मयत/रक्त संबधी कौटूंबिक वाटणीपत्र/रक्तसंबधी बक्षीसपत्र/वारसा हक्क प्रमाणपत्र, अशा प्रकरणी जिथे प्रत्यक्ष आर्थिक व्यवहार घडून आलेला नाही, तिथे नोंदणी व मुद्रांक विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निश्चित केलेले मुद्रांक शुल्क किंवा रक्कम रु. ५००/- यापैकी कमी असलेली रक्कम हस्तांतरण शुल्क म्हणून आकारण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ८, कराधान नियम १ नुसार हस्तांतरण संलेख झाल्यानंतर सर्वसाधारण हस्तांतरण प्रकरणात तीन महिन्याच्या आत आणि वारसा हक्क हस्तांतरण प्रकरणाच्या बाबतीत एक वर्षाच्या आत मा. आयुक्त यांस नोटीस दिली पाहिजे अशी तरतूद आहे. सदर तरतुदींच्या अनुषंगाने सदरील दोन्ही प्रकरणांमध्ये दस्त नोंदणी दिनांकापासून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास, देय होणाऱ्या हस्तांतरण शुल्क रकमेवर चालू वर्षाच्या एप्रिल महिन्यातील आर.बी.आय लेडींग रेट + ३% प्रति वर्ष यानुसार विलंब शुल्क आकारण्यात यावे. प्रकरणी नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने विलंब शुल्काची आकारणी दिनांक ०१ ऑक्टोंबर २०२५ पासून लागू करण्यात येत आहे. नोंदणीकृत दस्तऐवजाच्या आधारे हस्तांतरण शुल्क निश्चित करताना भाग करार आणि अभिहस्तांतरण करार झाले असतील तर, ज्या करारामध्ये मालमत्तेचे संपूर्ण मुद्रांक शुल्क वसूल करण्यात आलेले आहे. अशा करारानाम्याचा दिनांक हस्तांतरण शुल्क निश्चित करताना विचारात घेण्यात यावा.




### मनी हर्ष, रंगात रंगे श्रीरंग

श्रावणा संगी अवतरती,
नवे मेघ, नवे रंग, नवे उमंग
अवघी जीवसृष्टी बहरली,
मनी हर्ष, रंगात रंगे श्रीरंग

श्रावणात उगीच भरी हुंकार,
बालपणीचे मन अवखळ
क्षणात विस्मरे, तंग आयुष्याची,
मृगजळी धावपळ

चहू भूमीसह सागर-सरिता,
कड्यापठार डोंगरदरी
उधळत्या खट्याल वारूपरी,
बरसती श्रावणी धुंद सरी

बहकणाऱ्या मनाला,
सुचती नित्य गीत नवे
जणू स्वप्नी नयनात,
हिरवे स्वप्न अवतरावे

श्रावणाची गोडी भारी,
नूतन उभारी या संसारी
सर्व ऋतूचा महाराजा,
बहरलेली सृष्टी सारी

श्रावणी मेघ दाटले घनघोर,
नाचे आनंदाचा मनी मोर
बहु रंगाची उधळण,
घनश्याम कृपेच्या सरीवर सर

उल्हासित मना आज प्रमोदा,
श्रावणी स्फुरे कवन
वर्षातून येई हर्ष द्याया,
आला आला लाडका श्रावण



-प्रमोद म्हात्रे, पनवेल

# सततच्या पावसाने शेती पाण्यात

**माणगाव : बातमीदार**

यंदाचा पावसाळा कोकणातील बळीराजासाठी मोठे संकट ठरला आहे. पारंपरिक नक्षत्र-वाहनांवर आधारित पावसाचे अंदाज चुकवून पाऊस मे महिन्यापासूनच सुरू झाला. त्यानंतर जुलैमध्ये काही दिवस व ऑगस्टची सुरुवात वगळता रोजच हजेरी लावणाऱ्या संततधार पावसामुळे पावसाळी शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पूरस्थिती, पिकांची नासधूस आणि सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे.

ग्रामीण भागात शेती आजही नक्षत्र पद्धतीनुसार केली जाते. आश्लेषा, पुनर्वसू, मघा, पूर्वा, उत्तरा या नक्षत्रांतील वाहनांवरून पावसाचे अंदाज वर्तवले जातात, मात्र यंदा सारेच अंदाज फोल ठरले. श्रावण महिन्यात साधारणपणे सूर्यकिरण दिसतात, गोधड्या धुण्याचा-वाळवण्याचा प्रघात असतो, पण यंदा सततच्या पावसामुळे अनेक दिवस सूर्याचे दर्शन झालेच नाही.



सह्याद्रीच्या घनदाट पर्वतरांगा, निसर्गाची हिरवाई आणि विस्तीर्ण भातशेती ही रायगड जिल्ह्याची खरी ओळख आहे. भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशातील शेतकरी प्रामुख्याने पावसाळी भातशेतीवर अवलंबून आहेत, मात्र यंदाच्या तुफानी पावसामुळे या हिरव्या शेतांचे पाणी पाझरले आहे. अनेक ठिकाणी भातशेती पाण्याखाली गेल्याने पिकांचे संभाव्य नुकसान अतोनात आहे. शेतकऱ्यांचे वर्षभराचे कष्ट एका झटक्यात पाण्यात गेल्याने हतबलता वाढली आहे.

सततच्या पावसामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पिके पाण्यात बुडून नष्ट झाली. वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे जगणेच बिकट झाले आहे. पारंपरिक अंदाज असो वा हवामान खात्याचे तांत्रिक भाकीत यंदा चुकल्याने शेती पाण्यात गेली आहे. नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत शेतकरी शासनाकडे आर्जव करीत आहे.

गावागावात गणेशोत्सवाच्या तयारीची लगबग सुरू झाली असली तरी शेतकरी मात्र चिंतेत आहे. मघा नक्षत्रातील पाऊस साधारणपणे चांगला मानला जातो, पण यंदा सततच्या पावसामुळे गणेशोत्सवातही पावसाचा जोर कायम राहणार, असा इशारा जाणकारांनी दिला आहे.



**मुरूड : पावसाचे प्रमाण कमी झाले असले तरी अधूनमधून वारा जोरात वाहत आहे. सकाळच्या प्रहरी खाजणीच्या पुढे असणाऱ्या मुचणे गावानजीक एक भलेमोठे झाड रस्त्याच्या मधोमध पडले. त्यामुळे मुरुड व रोहा तालुक्यादरम्यान वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. प्रशासनाने युद्धपातळीवर काम करून हा रस्ता मोकळा केला.** (छाया : संजय करडे)

## प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर पतसंस्थेची सभा

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी मर्यादित पतसंस्थेला २१ वर्ष होत असताना आतापर्यंत लाखोंची उलाढाल झालेली आहे. येणाऱ्या काळात पतसंस्थेची अधिक भरभराट होणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष जनार्दन जाधव यांनी सांगितले.



संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शहरातील महात्मा गांधी वाचनालय येथे आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी अध्यक्ष जाधव बोलत होते. सचिव अनंत जाधव यांनी मागील वर्षाचा इतिवृत्त वाचून दाखवला असता त्याला सभासदांनी मंजुरी दिली. नवीन सभासदांबरोबरच पतसंस्थेतून सर्वसामान्य आणि गरजूंना कर्ज उपलब्ध करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी पतसंस्थेच्या तक्रार निवारण समितीवर राजेश कांबळे, प्रा.डॉ. डी.के. बामणे, साहेबराव गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सर्वसाधारण सभेला संस्थेचे संचालक मंडळ मारुती खाडे, लक्ष्मण मोरे, अपर्णा वाघमारे, वसंत शिरसाट, अरविंद वाघमारे, शैलेश जाधव, मनस्वी शिरसाट तसेच सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेण येथे रानभाजी व पौष्टिक तृणधान्य महोत्सव

**पेण : प्रतिनिधी**

रायगड म्हणजे एकेकाळी धान्याचे कोठार व कृषीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जात होता, पण कालपरत्वे औद्योगिकरणाच्या चक्रामध्ये शेतीकडे कळत नकळत दुर्लक्ष होत गेल्याने रानभाज्यांचे, तृणधान्यांचे महत्व संगणक युगातील नवीन पिढीला माहीत नाही. रायगड जिल्हा कृषी विभाग यांच्या माध्यमातून पेण तालुका कृषी विभागाने रानभाज्यांचे व तृणधान्यांचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या दृष्टीने आगरी समाज हॉल पेण येथे तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रानाभाज्या व पौष्टिक तृणधान्य महोत्सव २०२५चे आयोजन केले होते.



या महोत्सवाचे उद्घाटन खासदार धैर्यशील पाटील व आमदार रविशेठ पाटील यांच्या उपस्थितीत झाले. उद्घाटन समारंभास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव मानकर, उपसभापती नितीन पाटील, प्रांत अधिकारी प्रवीण पवार, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्यासह मोठ्य संख्येने कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

या महोत्सवामध्ये जिल्ह्यातील एकूण ५७ स्टॉल लागले होते, तर एकूण ३५० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. यात रानभाज्या तसेच कृषी खात्याशी संलग्न असलेल्या अन्न पदार्थांचा (पाककला) तसेच फळभाज्यांचा समावेश होता. काही बचत गटांनी अन्नपदार्थांचे स्टॉल लावले होते. त्यामध्ये नंबर काढण्यात आले आणि त्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. सर्व स्टॉलना खासदार धैर्यशील पाटील यांनी भेट देऊन वस्तूदेखील खरेदी केल्या.

## सुभाष महाडिक यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली





**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष व रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुभाष महाडिक यांचा श्रद्धांजली कार्यक्रम वसंतराव नाईक महाविद्यालयात झाला. काही दिवसांपूर्वी त्यांचे वयाच्या ७५व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले होते.

ॲड. इस्माईल घोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या श्रद्धांजली कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, व्यापारी बँकेचे चेअरमन संदीप पाटील, ज्येष्ठ शिवसैनिक प्रमोद भायदे, जिल्हा सरचिटणीस सुदेश वाणी, माजी नगरसेवक विश्वास चव्हाण, महात्मा फुले पतसंस्थेचे अध्यक्ष अजित गुरव, अस्लम हलडे, वासंती उमरोटकर, सुमित महाडिक, नितीन आंबुर्ले, कृष्णा अंबाजी, संतोष बुल्लू, नरेश बुल्लू, नितीन आंबुर्ले, सज्जाद हासवारे, सागर राऊत आदी उपस्थित होते.

या वेळी ॲड. इस्माईल घोले, ज्येष्ठ कार्यकर्ते सुधीर दांडेकर, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी नगरसेवक विश्वास चव्हाण, प्रमोद भायदे, वासंती उमरोटकर, माजी तहसीलदार नयन कर्णिक आदींनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले आणि आठवणी जागवल्या.



## मोरे महाविद्यालयाचे युवा महोत्सवात यश

**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाचा ५८वा युवा महोत्सव विभागीय स्पर्धांचे आयोजन नुकतेच अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज मुरूड जंजिरा येथे करण्यात आले होते. या महोत्सवात रोहा तालुक्यातील एम.बी. मोरे महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीने यश मिळविले.

युवा महोत्सवाचे उद्घाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. महोत्सवास विद्यापीठाचे पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. यात मोरे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी रांगोळी, कोलाज, मेहंदी व पेंटिंग या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थिनी संस्कृती संजय वासकर हिला मेहंदी स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले आहे. तिचे महाविद्यालयाची सांस्कृतिक समिती, प्राचार्य आणि प्राध्यापकांनी कौतुक व अभिनंदन केले.

## कर्जतमध्ये प्रारूप प्रभागांच्या सीमा प्रसिद्ध

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी जाहीर सूचना करण्यात आली तसेच प्रभागाच्या भौगोलिक यादी नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

कर्जत नगर परिषदेच्या सन २०२५मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यामाठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. हरकती व सूचना मुख्याधिकारी, कर्जत नगर परिषद यांच्याकडे सादर कराव्यात. १८ ते ३१ ऑगस्टदरम्यान हरकती व सुचना दाखल करण्यात याव्यात. नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल, असे नगर परिषद प्रशासनाने सांगितले आहे.

## धनगर समाज जिल्हाध्यक्षपदी शिवाजी दातीर

**खोपोली : प्रतिनिधी**

धनगर समाज महासंघाच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी माथाडी कामगार युनियनचे अध्यक्ष शिवाजी दातीर यांची, उपाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते अनंता हिरवे, आणि कर्जत तालुका युवक आघाडी अध्यक्षपदी अक्षय चोपडे यांची निवड करण्यात आली आहे.



धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे यांच्या आदेशानुसार कोकण संपर्क प्रमुख रामचंद्र पुकळे आणि प्रभारी अध्यक्ष आनंद कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली तिघांची नुकतीच निवड करण्यात आली

धनगर समाज महासंघ गेल्या अनेक वर्षांपासून समाजाच्या प्रत्येक वाडीवस्तीवर जाऊन मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करून शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आहे तसेच अनेक गोरगरीब, वंचित अनाथ मुले दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च करीत आहे.

पदाधिकारी निवडीवेळी पुकळे व कचरे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते बबन कराडे, बाबू कोकरे, युवा नेते शिवाजी रुपनवर, उद्योजक आशिष चोपडे, भीमराव ओलेकर, सचिन बंडगर, शरद कोळेकर, बिरदेव शेजाळ, धुळा मासाळ, श्रीकांत गावडे आदी समाज बांधव उपस्थित होते.

## मुरूडमध्ये मंगळागौर स्पर्धा रंगली

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका शिवसेना महिला आघाडीतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही भंडारी बोर्डिंग येथील हॉलमध्ये मंगळागौर व भवर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र दळवी व मानसी दळवी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा झाली. स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

मंगळागौर स्पर्धेसाठी एकूण पाच ग्रुपने आणि भवर स्पर्धेसाठी दोन ग्रुपने सहभाग नोंदविला. स्पर्धा पाहण्यासाठी महिलांनी मोठी गर्दी केली होती. मंगळागौर स्पर्धेत प्रथम क्रमांक संत शिरोमणी नामदेव महाराज शिंपी समाज (रोख रक्कम १५ हजार, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र), द्वितीय क्रमांक नारीशक्ती महिला मंडळ नांदगाव (रोख रक्कम १० हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र) व तृतीय क्रमांक रायगडची हिरकणी (रोख रक्कम सात हजार व प्रमाणपत्र) यांनी पटकाविला. भवर स्पर्धेसाठी शेगवाडा महिला मंडळ व शीतलादेवी महिला मंडळ वावडुंगी यांना प्रत्येकी रोख रक्कम पाच हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभा मानसी दळवी, संजीवनी नाईक, शिवसेना रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, मुरुड तालुका संघटक यशवंत पाटील, बांधकाम विभाग प्रमुख दिनेश मिनमीने, महिला आघाडी जिल्हाप्रमुख निर्मला म्हात्रे, संघटक तृप्ती पाटील, मुरुड तालुकाप्रमुख मंदा ठाकूर, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, माजी नगरसेविका युगा ठाकूर, शहरप्रमुख संगीता परकर, राजपुरी जिल्हा परिषद संपर्कप्रमुख जीविता मिनिमीने, नगमाना खानजादे, बेबा पाटील, स्वाती मयेकर, प्रतिभा गायकर, पूनम महाडिक, सरपंच ऋतुजा वरणकर, उषा खोत, नैनिता कर्णिक उपस्थित होते.



## वीरशैव माहेश्वर मंडळ जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मणस्वामी जंगम



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील लांडर येथील जंगम समाजाचे ज्येष्ठ नेते लक्ष्मणस्वामी जंगम यांची रायगड जिल्हा वीरशैव माहेश्वर मंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा वीरशैव माहेश्वर मंडळाची सभा माणगाव येथे मामू गुरुजी यांच्या निवासस्थानी झाली. या सभेत जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मणस्वामी जंगम, सरचिटणीसपदी राजेंद्रस्वामी जंगम (खरीवली, माणगाव) आणि सहसचिव म्हणून प्रणवस्वामी (माणगाव) यांची निवड करण्यात आली.

लक्ष्मणस्वामी जंगम हे सध्या पंचक्रोशी जंगम समाज रोहाच्या अध्यक्षपदी काम करत असून ते लांडर गावचे पोलीस पाटील आहेत. ते समाजाच्या आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक कार्यात पुढाकार घेत असतात. त्यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अनेकांनी अभिनंदन केले.




**खोपोली : सामाजिक कार्यकर्ते प्रा. अविनाश मोरे यांना बुज हास्य क्लबमार्फत सत्कार करण्यात आला. मोरे यांनी आजवर केलेल्या समाजकार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला बूज हास्य क्लबचे संस्थापक अध्यक्ष बाबूभाई ओसवाल, माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, 'कोमसाप'चे अध्यक्ष राजोपाध्ये, शेखर जांभळे, विठ्ठलानी आदी उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे)

# वनडे क्रमवारी पुन्हा जाहीर!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसीला एका गंभीर चुकीमुळे आपली एकदिवसीय फलंदाजांची क्रमवारी पुन्हा जाहीर करावी लागली. यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या क्रमवारीत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची नावे अनपेक्षितपणे गायब झाली होती. या गंभीर चुकीची दखल घेत आयसीसीने तातडीने उपाययोजना केल्या आणि आता सुधारित क्रमवारीसह एक निवेदनही प्रसिद्ध केले आहे.

आयसीसीने १९ ऑगस्टपर्यंत अद्ययावत केलेली नवी वनडे क्रमवारी जाहीर केली आहे. यानुसार भारतीय संघाचा सलामीवीर शुबमन गिल ७८४ रेटिंगसह अव्वल स्थानी कायम आहे. त्यानंतर रोहित शर्मा ७५६ रेटिंगसह दुसऱ्या स्थानी परतला आहे. एकेकाळी अव्वल स्थानी वर्चस्व गाजवणारा पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझम आता ७३९ गुणांसह तिसऱ्या स्थानी घसरला आहे. विराट कोहलीने ७३६ गुणांसह आपले चौथे स्थान पुन्हा मिळवले आहे.

आयसीसीने बुधवारी जाहीर केलेल्या मूळ क्रमवारीत रोहित आणि विराट यांची नावे अव्वल १०० खेळाडूंमधूनही गायब झाली होती, तर बाबर आझमला दुसऱ्या स्थानी दाखवण्यात आले होते. रोहित आणि विराट दोघेही सध्या एकदिवसीय क्रिकेटमध्ये सक्रिय असतानाही त्यांना क्रमवारीतून वगळल्याने क्रिकेट विश्वात मोठा गोंधळ उडाला होता. विशेषतः सोशल मीडियावर यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या, ज्यानंतर आयसीसीने आपली चूक सुधारण्यासाठी पावले उचलली.

**रोहित-विराटच्या स्थानावर शिक्कामोर्तब**

या गोंधळावर आयसीसीने निवेदन जारी करून स्पष्टीकरण दिले आहे. निवेदनात म्हटलंय की, या आठवड्यातील वनडे क्रमवारीतील काही त्रुटींची आम्ही चौकशी करत आहोत. झालेली चूक तत्काळ दुरुस्त करण्यात आली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना अनुक्रमे दुसरे आणि चौथे स्थान पुन्हा देण्यात आले आहे. या बदलाचा इतर कोणत्याही खेळाडूच्या क्रमवारीवर परिणाम झालेला नाही.

यापूर्वीही आयसीसीकडून सांघिक क्रमवारीत अशा चुका झाल्याचे दिसून आले आहे. आता पुढील आठवड्यात जाहीर होणाऱ्या नव्या क्रमवारीनंतरच चित्र अधिक स्पष्ट होईल, ज्याची क्रीडाप्रेमी आतुरतेने वाट पाहत आहेत.

# राज्य पिंच्याक सिलॅट स्पर्धेत नवी मुंबई संघ विजेता

**पाली : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनच्या वतीने १५व्या पिंच्याक सिलॅट राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन क्राईस्ट अकॅडमी स्कूल कोपरखैरणे, नवी मुंबई येथे करण्यात आले होते. स्पर्धेत ४६ सुवर्ण, २० रौप्य आणि १२ कांस्य अशी सर्वाधिक पदके मिळवून नवी मुंबई संघाने विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेमध्ये २६ जिल्ह्यातील ४८५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. प्री-टेन, सब ज्युनिअर, ज्युनिअर वयोगटातील मुला-मुलींसाठी लढती झाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन शिवाजीराव थोरवे चेअरमन टीएनटी इन्फ्रा लि. पुणे, फादर जिंटो प्रिन्सिपल क्राइस्ट अकॅडमी स्कूल, किशोर येवले राष्ट्रीय अध्यक्ष इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन, सुरेंद्र प्रताप सिंग अध्यक्ष महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोशियन, संजीव पांडे एमएसएमई इंडिया व्हाईस चेअरमन, हरिदास थोरवे पोलीस निरीक्षक, मिथुन जोशी उपशहरप्रमुख शिवसेना नवी मुंबई, डी.एन. मिश्रा समन्वयक पनवेल, सुरेखा येवले, सुरेखा पाटील, मुकेश सोनवणे, प्रकाश पार्टे, पोर्णिमा तेली आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.



बक्षीस वितरण समारंभास औदुंबर पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोपरखैरणे, किशोर येवले, संजय जाधव, तृप्ती बनसोडे, धनंजय जगताप, संकेत धामंडे, अरविंद शिर्के, विलास कांबळे, प्रवीण कुडले, सागर शेलार, योगेश पानपाटील, नागेश बनसोडे दत्ता भवारी, ओंकार मोहिते, आश्विनी राऊत, पल्लवी म्हात्रे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत ४३ सुवर्ण व एक रौप्यपदक मिळवून सांगली जिल्ह्याचा संघ दुसऱ्या स्थानी, तर प्रत्येकी १३ सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके मिळवून तिसऱ्या स्थानी नाशिक जिल्ह्याचा संघ राहिला. विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करण्यात येत आहे. यशस्वी खेळाडूंची निवड २६ ते २८ सप्टेंबरदरम्यान रोजी कर्नाटकातील हुबळी येथे होणाऱ्या १३व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.

## क्रिकेटपटूंसाठी आता रग्बी सेंट्रिक ब्रॉन्को टेस्ट

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंना फिटनेस सिद्ध करण्यासाठी यो यो टेस्टचा टप्पा पार करावा लागतो. आता बीसीसीआयने क्रिकेटर्सच्या फिटनेससाठी नवा फंडा आजमावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार संघात स्थान मिळवण्यासाठी प्रत्येक खेळाडूला रग्बी सेंट्रिक ब्रॉन्को टेस्टला सामोरे जावे लागणार आहे.

# श्रेयस नाराज नाही, पण आतून नक्कीच खचलेला असणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या ९ सप्टेंबरपासून आशिया चषक स्पर्धेला सुरुवात होणार आहे. बीसीसीआयकडून या स्पर्धेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. आयपीएल स्पर्धेत दमदार कामगिरी करणाऱ्या श्रेयस अय्यरला या स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान देण्यात आलेले नाही. हा अत्यंत चुकीचा निर्णय असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. दरम्यान आता श्रेयसच्या वडिलांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे.

**वडिलांची प्रतिक्रिया**

यावर एका मुलाखतीत श्रेयस अय्यरच्या वडिलांनी म्हटलेय, मला समजत नाही की, भारतीय टी-२० संघात निवड होण्यासाठी श्रेयसला आणखी काय करावे लागेल. आयपीएलमध्ये तो वर्षानुवर्ष दमदार कामगिरी करत आहे. दिल्ली कॅपिटल्सपासून ते कोलकाता नाईट रायडर्सपर्यंत त्याने कर्णधार म्हणून दमदार कामगिरी केली आहे. २०२४मध्ये झालेल्या आयपीएल हंगामात त्याने कोलकाता संघाला आयपीएल चॅम्पियन बनवले. या वर्षी झालेल्या हंगामात त्याने पंजाब किंग्ज संघाला आयपीएलच्या अंतिम फेरीत पोहचवले. मी असे म्हणत नाही, की त्याला कर्णधार बनवा, पण निदान संघात तरी घ्या.

ते पुढे म्हणाले, श्रेयसला संघाबाहेर ठेवले तरी तो नाराजी दाखवत नाही. तो फक्त एवढच म्हणतो, शेवटी माझे नशीब आहे. तो नेहमीच शांत आणि संयमी राहतो. कधी कोणाला दोष देत नाही, पण आतून नक्कीच खचलेला असेल.

# अजिंक्य रहाणेचा दिलदारपणा

## मुंबई संघाच्या भविष्यासाठी कर्णधारपदावरून पायउतार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे याने आगामी देशांतर्गत हंगामापूर्वी मुंबई क्रिकेट संघाचे कर्णधारपद सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ३७ वर्षीय रहाणेने आपले वय आणि संघासाठी नवीन कर्णधार घडवण्याची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असल्याचे समजते. तथापि, एक खेळाडू म्हणून तो मुंबई संघाचा अविभाज्य भाग असेल. रहाणे याने कर्णधारपद सोडण्याची ही घोषणा सोशल मीडियावरून केली.

रहाणेच्या मते, मुंबई संघासाठी नवीन कर्णधार तयार करण्याची हीच योग्य वेळ आहे. त्याने संघासाठी एक खेळाडू म्हणून आपले योगदान पूर्वीप्रमाणेच सुरू ठेवणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.

'एक्स'वर पोस्ट करत रहाणेने त्याचे म्हणणे मांडले आहे. त्याने म्हटलंय की, मुंबई संघाचे कर्णधारपद भूषवणे आणि विजेतेपद पटकावणे हा माझ्यासाठी अत्यंत सन्मानाचा क्षण होता. येणाऱ्या देशांतर्गत हंगामाचा विचार करता एका नवीन कर्णधाराला तयार करण्याची हीच योग्य वेळ आहे, असे मला वाटते. त्यामुळे मी कर्णधारपदाची जबाबदारी पुढे न सांभाळण्याचा निर्णय घेतला आहे. एक खेळाडू म्हणून माझे सर्वोत्तम योगदान देण्यासाठी मी पूर्णपणे वचनबद्ध आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनसोबतचा माझा प्रवास सुरू ठेवेन, जेणेकरून आपण भविष्यात आणखी विजेतेपदे जिंकू शकू. अगामी हंगामासाठी मी खूप उत्सुक आहे, असेही रहाणेने नमूद केले आहे.




अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली मुंबईने २०२३-२४ हंगामात विजेतेपद पटकावत रणजी करंडकाचा सात वर्षांचा दुष्काळ संपवला होता. त्यानंतर संघाने २०२४-२५ हंगामात इराणी करंडकही जिंकला. कर्णधारपद सोडले असले तरी आपला निवृत्तीचा कोणताही विचार नसल्याचे रहाणेने स्पष्ट केले आहे. तो सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये एक फलंदाज म्हणून मुंबई संघासाठी खेळत राहणार आहे, असे त्याने स्पष्ट केले आहे.

### कोण होणार नवा कॅप्टन?

अजिंक्य रहाणेच्या निर्णयानंतर मुंबई संघाचा पुढील कर्णधार कोण असेल यावर चर्चा सुरू झाली आहे. मुंबई संघात श्रेयस अय्यर, सूर्यकुमार यादव, शार्दुल ठाकूर, यशस्वी जैस्वाल आणि सर्फराज खान यांसारखे अनुभवी खेळाडू उपलब्ध आहेत. रहाणेच्या जागी मुंबईच्या कर्णधारपदासाठी श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादव हे दोघे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. अष्टपैलू शार्दूल ठाकूर हाही या शर्यतीत आहे.

# रिओ वर्ल्ड चॅम्पियनशिपपूर्वी
# जिमनॅस्ट संयुक्ता काळेला क्रिडामंत्र्यांकडून शुभेच्छा





**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची युवा रिदमिक जिमनॅस्ट संयुक्ता प्रसेन काळे हिची रिओ दि जानेरो (ब्राझील) येथे होणाऱ्या वर्ल्ड रिदमिक जिनॅस्टिक चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या पार्श्वभूमीवर क्रीडा व युवक कल्याणमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी संयुक्ताशी दूरध्वनीवरून संवाद साधत तिला शुभेच्छा दिल्या.

या संभाषणात मंत्री कोकाटे यांनी महाराष्ट्राची हिरकणी असा संयुक्ताचा गौरव करत तिच्या खिलाडूवृत्तीचे कौतुक केले तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वतीनेही तिला शुभेच्छा दिल्या. संयुक्ताच्या पालकांसह प्रशिक्षक मानसी गावंडे आणि पूजा सुर्वे यांचेही अभिनंदन करण्यात आले. खेळासाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधांसाठी थेट फोन करण्याचे आवाहनही मंत्री कोकाटे यांनी केले.

संयुक्ता ही या जागतिक स्पर्धेसाठी भारतातून निवड झालेली एकमेव जिमनॅस्ट असून ती पाचव्या वर्षापासून फिनिक्स जिम्नॅस्टिक्स अकादमी ठाणे येथे प्रशिक्षण घेत आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक व शिवछत्रपती पुरस्कार विजेती पूजा सुर्वे यांचे तिला मार्गदर्शन लाभले आहे.

आजवर संयुक्ताने इंडिया युवा खेळ, राष्ट्रीय व इतर स्पर्धा मिळून १५० पदके (१२५ सुवर्ण) जिंकून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे तसेच आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सातवा क्रमांक मिळवत आंतरराष्ट्रीय पातळीवरही ठसा उमटवला आहे. याच स्पर्धेत मानसी गावंडे यांची भारताच्या संघाच्या प्रशिक्षक म्हणून निवड झाली आहे.

**किमया कार्लेचेही अभिनंदन**

नव्या ऑलिम्पिक सायकलमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर २३ मार्क ओलांडणारी पहिली भारतीय जिमनॅस्ट म्हणून किमया कार्ले हिचेही मंत्री कोकाटे यांनी अभिनंदन केले. क्लुज-नापोका (रोमानिया) २०२५ क्लब स्पर्धेत किमयाने हा ऐतिहासिक टप्पा गाठला. तिचे कौतुक करताना मंत्री कोकाटे यांनी तिला रिदमिकची किमयागार अशी उपाधी दिली.

## अजित आगरकर यांना मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटला आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवून सुवर्णकाळ दाखवणाऱ्या निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्यावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीचे बक्षीस म्हणून बीसीसीआयने त्यांचा कार्यकाळ जून २०२६पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.



जून २०२३मध्ये अजित आगरकर यांनी निवड समितीच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली होती. त्यानंतर भारतीय क्रिकेट संघाने यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत केली. आगरकर आणि त्यांच्या समितीने घेतलेले धाडसी निर्णय आणि दूरदृष्टी यामुळे संघाला अभूतपूर्व यश मिळाले.

अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या कार्यकाळात भारतीय संघाने चमकदार कामगिरी केली. त्यांच्या कार्यकाळात टीम इंडियाने अनेक वर्षांपासून हुलकावणी देणारा टी-२० विश्वचषक जिंकला. २०२४मधील या कामगिरीसह संघाने आयसीसी स्पर्धेतील विजेतेपदाचा दुष्काळ संपुष्टात आणला. यानंतर भारताने २०२५मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीच्या विजेतेपदाला गवसणी घातली. लागोपाठ दुसऱ्या वर्षीही आयसीसीची मोठी स्पर्धा जिंकून वर्चस्व सिद्ध केले. तत्पूर्वी २०२३मध्ये मायदेशात झालेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने अंतिम फेरीपर्यंत दिमाखात मजल मारली होती.

आगरकरांनी अनुभवी खेळाडूंच्या अनुपस्थितीत युवा खेळाडूंना संधी देऊन कसोटी संघातील स्थित्यंतराचा अवघड टप्पा यशस्वीपणे हाताळला. यामुळे संघाची कामगिरी कुठेही न खालावता भविष्यासाठी एक मजबूत संघ तयार झाला.


लोकनेते मा. खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त
श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित



रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा

अमृत महोत्सव

शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५

स्थळ : श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल, प्लॉट नं ४७५, मार्केट यार्ड, पनवेल

| भजन मंडळाचे नाव | पत्ता | बुवांची नावे | वेळ |
|---|---|---|---|
| गावदेवी प्रासादिक भजन मंडळ पेणधर | मु. पेणधर, पो. नावडे, ता. पनवेल | कु. पंकज यशवंत कोपरकर | स. १०.०० |
| श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ वावंजे | मु. पो. वावंजे, ता. पनवेल | धिरज विष्णू दाढावकर | स. १०.३० |
| कुलस्वामिनी प्रासादिक भजन मंडळ ओवेपेठ | मु. ओवेपेठ, खारघर, ता. पनवेल, | कु. एकता एकनाथ भाग्यवंत | स. ११.०० |
| श्री पांडूरंग प्रासादिक भजन मंडळ खारघर गाव | खारघर गाव, सेक्टर १३, खारघर | कु. प्राप्ती गोरखनाथ पाटील | स. ११.३० |
| शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे | मु. विचंबे, ता. पनवेल, | श्री. दिलीप बामा म्हात्रे | दु. १२.०० |
| जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वलप | मु. वलप, ता. पनवेल, | श्री. विश्वनाथ रघूनाथ पाटील | दु. १२.३० |
| नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा | कोपरा, खारघर, ता. पनवेल | सौ. शिवमालाताई पाटील | दु. ०२.०० |
| राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळ वावंजे | मु. पो. वावंजे, ता. पनवेल | तेजस्वी संतोष पाटील | दु. ०२.३० |
| श्री सद्गुरु वामनबाबा प्रासादिक भजन मंडळ | मु. सिध्दीकरवले, पो. करवले | श्री. दिनेशबुवा पाटील | दु. ०३.०० |
| श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ गव्हाण | मु. पो. गव्हाण, ता. पनवेल | श्री. देवानंद कोळी | दु. ०३.३० |
| जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ वाजे | मु. वाजे, ता. पनवेल | कु. सानिया भगत | सायं. ०४.०० |
| श्री विश्वविजयनाथ सुहास्य संगीत विद्यालय | मु. पो. दिघोडे, ता. उरण | कु. मृणाली विकास ठाकूर | सायं. ०४.३० |
| श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारघर | खारघर गाव | श्री. अमित पद्माकर पाटील | सायं. ०५.०० |
| जय श्री राधे गोविंद भक्ती समुह | सेक्टर ५ कामोठे, पनवेल | श्री. अनिल खोसरे | सायं. ०५.३० |
| सिध्देश्वर प्रासादिक भजन मंडळ | मु. तळोजे मजकूर, ता. पनवेल | सौ. तृप्ती अविनाश पाटील | सायं. ०६.०० |

रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५

स्थळ : श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल, प्लॉट नं ४७५, मार्केट यार्ड, पनवेल

| भजन मंडळाचे नाव | पत्ता | बुवांची नावे | वेळ |
|---|---|---|---|
| श्रीराम वरदायिणी भजनी मंडळ उलवे | साई प्राईड, से. १९, उलवे | सागर मारुती उतेकर | स. ०९.३० |
| श्री स्वामी समर्थ भजन मंडळ अंजप | मु. अंजप, पो. वाकस | शाम काळूराम मिनमीने | स. १०.०० |
| जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ खोपोली | खोपोली, खालापूर | सौ. रेश्मा नितीन जोशी | स. १०.३० |
| श्री सद्गुरु कृपा प्रा.महिला भजन मंडळ चिंचवली | खालापूर | सौ. प्रिती प्रयाग जाधव | स. ११.०० |
| श्री. गंगादेवी भजन मंडळ | मु. पो. ता. अलिबाग, | श्री. समर्थ सखाराम पाटील | स. ११.३० |
| श्री सिध्देश्वर प्रा.सं. भ..मंडळ आ.(पाठक माळी) | आवास, ता.अलिबाग | भुषण किशोर माळवी | दु. १२.०० |
| श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ | मु. कोलीवळी (नेरुळ) | कु. चंदना आत्माराम डांगरे | दु. १२.३० |
| शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ शिरसे | मु. शिरसे, पो. कोंदीवडे | सौ. प्रणिता देशमुख | दु. ०२.०० |
| स्वरविहार भजन मंडळ अलिबाग | गोंधळपाडा, अलिबाग | विशाल विजय महाडिक | दु. ०२.३० |
| श्री सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ | मु. पो. खरसई, ता. म्हसळा | कु. भावेश संतोष शितकर | दु. ०३.०० |
| कै. वैजयंती माता भजन मंडळ सावळे रसायनी | मु. सावळे, पो. रसायनी | कु. श्रध्दा नितीन माळी | दु. ०३.३० |
| आई एकविरा महिला भजन मंडळ | मु. दुंदरेपाडा, पो. मोरबे | सौ. सुजाता पाटणकर | सायं. ०४.०० |
| सुरताल भजन मंडळ नारंगी | मु. नारंगी, पो. डोनवत | श्री. रुपेश अनिल देशमुख | सायं. ०४.३० |
| ओम साई भजन मंडळ खरसुंडी | रा. खरसुंडी, ता. खालापूर | हर्षदा सुशांत सालेकर | सायं. ०५.०० |
| ओंकार संगीत भजन मंडळ नेरळ | सद्गुरु कृपा बंगला,नेरळ | सौ. मंजिरी सागर सावंत तेरसे | सायं. ०५.३० |


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com